

# श्री साईलीला


या अंकांत—


- नामदेवांची अमृतवाणी !
- संत-वचनाचें महत्त्व
- भगवद्भक्त जयदेवस्वामी
- आपुलें आपुल्या संगें
- बाबांची लीला
- श्री अरविंद्-वाणी
- कांहीं विचार करण्यासारखें
- पोंच व अभिप्राय
- भक्तांकडून आलेल्या देणग्या
- शिरडी वृत्त


नोव्हेंबर १९६७

पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७२१



# श्री साई वाक्सुधा

ग्रंथ वाचल्यानें आपला कार्यभाम साध्य होत नाहीं. जें वाचलें तें आपल्या कृतींत उतरलें पाहिजे. त्या ग्रंथांतील भावार्थाचा आपण निदिध्यास घेतला पाहिजे. तसें घडलें नाहीं तर पुस्तकीज्ञान व्यर्थ होय. तुम्हीं वेद वाचा, उपनिषदें वाचा, गीता वाचा किंवा रामायण, महाभारत वाचा जें आचरणांत येईल तेवढें तुमचें. बाकीचें त्या ग्रंथाचें. तें केवळ ग्रंथांत गडप होऊन रहायचें. तुम्हीं कोरडे पाषाण! असें होतां कामा नये.

—श्रीसाईसच्चरित


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४६ वें ] नोव्हेंबर १९६७ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

मागील अंकांत सूचित केल्याप्रमाणें श्रीसाईलीला मासिकांत सध्यांच्या काळा अनुसरून जरूर वाटणाऱ्या सुधारणा घडवून आणाव्या असें अलिकडे तीव्रते वाटूं लागलें आहे. कोणतीही गोष्ट पार पाडायची असो. तिचा तुम्ही सतत ध्या घ्यावा लागतो. तसंच झालंय साईलीला सुधारणेचें.

या सुधारणा कार्यांत आम्ही सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा करीत आहोंत एकटा कोणीही असो; तो लक्षांत भरण्यासारखें असें सहसा फारसें कांहीं करूं शक नाहीं. ज्यांना त्या कार्याचें महत्त्व पटतें अशा अनेकांनी त्याला सहकार देण्यासाठ पुढें यावें लागतें. निदान यावे, अशी अपेक्षा असते.

मासिक हें एक लोकशिक्षणाचें हुकमी साधन आहे. या साधनाचा लोक कल्याणाच्या दृष्टीनें आपण सदुपयोग केला पाहिजे. जितका व ज्यापरीनें सदुपयोग करतां येईल तेवढा झटून केला पाहिजे.

साईबाबा हें मानव्याचे, माणुसकीचे पुजारी होते. सर्वधर्म समन्वयी होते. सर्वांनीं एकमेकांशीं बंधुभावानें वागावें. एकमेकांच्या हातांत हात घालून परोपकार रत होऊन वागावें, कोणी कोणाचा द्वेष वा मत्सर करूं नये. जो उद्योग किंवा व्यवसाय आपल्या वाट्यास आला असेल तो इमानें इतबारें, मन लावून व कौशल्यपूर्वक करावा, त्यांतील प्राविण्याच्या बळावर नाव मिळवावें व जगांत निरभिमानी वृत्तीनें वागावें हीच मुख्यतः होती बाबांची शिकवण.

प्रत्येक मनुष्य ज्ञानी, उद्योगी नि कर्तबगार बनला पाहिजे. प्रत्येक माणसानें, मी जनावर नसून माणूस आहे; माणसाचा दुर्लभ जन्म माझ्या वांट्यास आला आहे. जन्माचें सार्थक करून घेण्यास प्रवृत्त करणारा असा हा मानवजन्म आहे. या जन्माचा आपण जास्तींतजास्त सदुपयोग करून घेतला पाहिजे.

सत्संगती, सद्ग्रंथांचें व सुबोध नि मार्गदर्शक लेखांचें वाचन हें केव्हांही त्या दृष्टीनें पोषक होत असतें. आपल्या शरिराचें जसें पौष्टिक अन्नपदार्थांच्या सहाय्यानें

पोषण झालें पाहिजे, तसेंच सद्विचारी, परिणामकारक नि पोषक विचारांनीं आपल्या मनाचें पोषण होणें तितकेंच अत्यावश्यक आहे.

'साईलीला' हें मासिक शिर्डी संस्थानतर्फें गेलीं शेचाळीस वर्षें त्याच सद्देतूनें चालविलें जात आहे. तें अधिक उपयुक्त, अधिक सुंदर नि अधिक व्यापक व उपकारक होऊन रहावें असें वाटूं लागणें न त्यासाठीं शक्य नि जरूर ती धडपड करूं लागणें ही बाबांचीच प्रेरणा होय. ही प्रेरणा सर्वांभूतीं झाली पाहिजे. सर्वांना या दृष्टीनें आपण कांहीं ना कांहीं करून मासिक रूपानें हें जें एक लोकशिक्षणाचें साधन आपल्यापाशीं आहे तें अधिकाधिक उपयुक्त नि कल्याणप्रद कसें होईल याचा सर्वांनीं विचार केला पाहिजे.

त्या दृष्टीनें विचारविनिमय करण्यासाठीं व विचारांची दिशा समजून घेण्यासाठीं आमच्या कांहीं लेखक–मित्रांची एक छोटीशी सभा गेल्या महिन्यांत साई–निकेतनमध्यें घेण्यांत आली होती. त्यावेळीं मासिकांत अंतर्बाह्य सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें बोधप्रद नि भावी काळाच्या दृष्टीनें मार्गदर्शक अशी चर्चा झाली.

श्रीसाईलीला हें मासिक घरोघर गेलें पाहिजे. लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना त्याचें आकर्षण वाटलें पाहिजे. केवळ अध्यात्म निरूपण हें त्याचें स्वरूप कां असावें ? माणसाच्या उत्कर्षाला कारणीभूत होऊन रहाणाऱ्याला व ज्ञानांत भर घालणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्यांचा अंतर्भाव त्यांत कां होऊं नये ?

साधक या नात्यानें त्याला पोषक व मार्गदर्शक होणाऱ्या नि त्याचा दर्जा वाढविण्यास सहाय्यभूत होणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्यांचा लाभ या मासिकाच्याद्वारें करून देणें अयोग्य होणार नाहीं. एवढें मात्र निश्चित कीं, या मासिकाचा जो एक विशिष्ट दर्जा आहे तो कायम ठेवणें जरूर आहे. तो दर्जा खालीं आणण्यांत येऊं नये. तो संभाळून त्यांत विविधता, वैचित्र्य व विचारमाधुरी आणतां येणें शक्य आहे ती आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला पाहिजे.

अशाप्रकारचे विचार ज्याप्रमाणें प्रदर्शित करण्यांत आले त्याचप्रमाणें बाह्यांगांतही सुधारणा करण्याची जरुरी जाणविण्यांत आली. मासिकाचा सध्यांचा जो आकार आहे तो बदलून प्रसाद, किंवा किर्लोस्करच्या आकारात मासिक प्रसिद्ध करण्यांत

यावें ही सूचना जशी अनेकांकडून आली त्याचप्रमाणें मासिकाच्या नावांतही बदल करण्याची सूचना कांहींजनांनीं केली.

हा चर्चेचा सारांश त्रोटकपणें येथें देण्याचा हेतू एवढाच कीं, आमच्या वर्गणीदार—वाचकांनींही या सर्व बाबतींत आम्हांला सहकार द्यावा. विशेषतः मासिकांचा आकार व नांव यांत बदल होणें जरूर आहे का ? याबद्दल कृपा करून आपापली मतें मुंबई कचेरीच्या पत्त्यावर कृपा करून कळवावी.

पुढील वर्ष हें सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळें त्याला फार महत्त्व आहे. त्या ज्या कांहीं घडामोडी व्हायच्या आहेत, त्यांत या मासिकाच्या बाबतींतही जरूर वाटणाऱ्या लोकशिक्षणाच्या दृष्टीनें उपकारक अशा कांहीं अत्यावश्यक सुधारणा घडून येणें जरूर आहे.

श्रीसाईबाबांच्या कृपेनें या सुधारणा कार्यांत अनेकांचा सहकार मिळून आमचे संकेत पूर्णत्वाला येतील अशी आम्हीं आशा बाळगून आहोंत.

—संपादक



# नामदेवांची अमृतवाणी ( हिंदी )

अनुवादक : **गणेश विष्णू कविटकर**, एम्. ए.

## हरि नांव हीरा हरि नांव हीरा

हरिभक्तांना हरिनाम हा हिरा आहे. अत्यंत दृढ आणि प्रकाश देणारे ते बहुमोल रत्न आहे. हरिनाम सर्व पीडा, दुःख, कष्ट नाहींसे करते. हरिनाम हीच माझी जातपात. हरिनामच जीवनांत क्रांती करणारे आहे. हरिनाम ही सर्व सुखाची रास आहे. हरिनाम मृत्यूपाश तोडून टाकते. अखिल भुवनांत हरिनाम हेच तत्त्वसार आहे. हरिनामानेंच नामदेव तरून गेले.

## राम नाम षेती राम नांम बारी

रामनाम ही माझी शेती आहे. रामनाम ही माझी बाग आहे. भगवान श्रीकृष्ण हेच आमचे धन. या धनाची थोरवी तर पहा. तें चोराला हरण करतां येत नाहीं. ते गंजतहि नाहीं. ते रामतत्त्व ( ब्रह्म ) दाही दिशांना पुरून उरलें आहे. तें सत्य ( ब्रह्म ) सदा सर्वदा जवळ आहे. ते अतीव दूर असूनहि तेथून निरीक्षण करीत आहे. नामदेव म्हणतात, माझा श्रीकृष्ण सर्वत्र आहे. त्याचा तर्कवितर्क कोणाला करतां येत नाहीं.

## रांमसो धन ताको कहा अब थोरौ

आतां त्या रामनाम धनाची काय थोरवी सांगूं ! आणि गमाहिमादि अष्टसिद्धी आणि नवनिधी देखील त्या धनाच्या प्राप्तीसाठीं याचना करतात. हिरण्यकश्यपूनें ठार मारीन असा धाक दिला आणि राज्य देईन असें म्हटले तरीसुद्धां इंद्राचें तें वैभव प्रल्हादानें स्वीकारलें नाहीं. देव आणि दानव ज्याला संपत्ति समजतात त्याला ईश्वराचे सेवक आपत्ति मानतात. धर्म, अर्थ व काम ह्यांची याचना मुमुक्षु कधीं करणार नाहींत, कारण नामदेव म्हणतात, त्यांच्या हृदयांत प्रेमभक्ति जागृत झालेली असते.

## मंझा प्रांन तूं बीठला

हे विठ्ठला ! तूं माझा प्राण आहेस. अहो बापा ! ! मार्गांतच प्रतिरोध झाल्यामुळें मी अडकून पडलों आहे. कलि खोटा आणि कलियुग पापपूर्ण आहे म्हणून

श्रीगोपाला ! या भावबंधनांतुन तुम्ही मला मोकळे करा. ( हे ऐकून ) नारायणानें भवपाश छेदून टाकले. नामदेव ( म्हणतात ), परमेश्वरानें उपाय केला. आतां वाहन ( तारूं ) चालूं लागले आहे. पार उतरा, मुक्त व्हा.

### रांम रमे रमि रांम संभारै

रामनामीं जो रममाण झाला आहे, रामनामाचे स्मरण करण्यांत जो तन्मय झाला आहे त्याकरितां एक क्षण न वालवितां मी मला ( माझी काया ) ओवाळून टाकीन. रामनामांत रमलेल्यांनाच राम तारतो व त्याला वैकुंठनाथ श्रीकृष्ण भेटतो. हे मूर्ख प्राण्या ! रामनाम घेण्यास लाजूं नकोस. परब्रह्माचे गुणगान करण्याचे साधन म्हणजे शरीर मला सद्भाग्यानें लाभलेले आहे. हेच शरीर धारण केल्यानें इहलोकीं मोठेपण आले आहे; पण नामदेव रामनाम कधीं हि विसरणार नाहीं.

### मोर पिया बिलम्यो परदेश

माझा प्रियकर ( प्रभु ) परदेशी जाऊन बराच काळ झाला आहे. मी आतां होळी कोणाशी खेळूं ? ( रंग अभीरादि कोणावर उडवूं ? ) मला घटका प्रहर गेलेले कळत नाहीं. कोणी मला हिताच्या गोष्टी सांगत नाहीं. पानें टवटवीत झाली. वनें पुष्पान्वित झाली. मधुकर गुंजारव करूं लागले. हाय हाय माझा पति घरीं नाहीं ! माझी हांक कोण ऐकेल ? ज्या दिवशीं प्रियकर निघून गेला त्या दिवसापासून मी माझ्या भांगांत शेंदूर घातला नाहीं. पानें फुलें इत्यादि सुखांचा त्याग केला. अंगास तेलदेखील लावले नाहीं. डोळ्यांत भरपूर झोप असूनहि ( या विरह व्यथेनें ) मला रात्रंदिवस झोप येत नाहीं. ही माझी सवत भयंकर दुःख देत आहे, हैराण करीत आहे. आणि प्रियकराचा मार्ग तर फार दूर आहे. वीजा चमकूं लागल्या. मेघांचा गडगडाट सुरू झाला. त्यामुळें भीषण विरहयातना अधिक जाणवूं लागल्या. चित्त चातक आहे असे बेडूक बोलतो; आणि त्याच वनांत मोरहि तेच सांगतो. प्रेम-प्रीतीची शाई आणून प्रियकराला पत्रिका लिहून पाठविली कीं दास नामदेवाचा जन्म व्यर्थ जात आहे. तरी माझ्या प्रियतमानें मला लवकर भेट द्यावी.

# संत-वचनाचें महत्त्व

( लेखक : डॉ. के. बी. गव्हाणकर )

आईच कामधेनु व कल्पतरू असल्यावर लेकराला काय कमी ? कामधेनू कल्पना करावी तेव्हां, जेवढी इच्छा केली असेल तेवढीच वस्तु देते. आई, श्रीसाई मधेनू असल्यावर, त्या आईलाच बाळाच्या सर्व कल्याणाच्या प्रिय कल्पना कराव्या गतात व त्या आवडीपलीकडे ती पुरवीत रहाते. त्यातून श्रीसाईमाउलीचा हा बाळ गजे प्रियता पुरविणारा, मग ती माउली, त्या बाळावरून किती ओवाळून जाईल ? ळ जन्माला येतें तेव्हांच तें आईच्या सर्व भाग्याला अधिकारी होतें. बाळाला सही ं लागली-त्याला कळूं लागलें-म्हणजे तो अधिकारी होतो असें नाहीं, तर न ळणाऱ्या बालअवस्थेंतही तो अधिकारी, सुखाचा, प्रेमाचा भोगी असतो. त्याच- ाणें श्रीसंतांनी कळकळीने अक्षरें लिहिली तेव्हांच त्यांचे म्हणणारे जेवढे आहेत, ना श्रीसंताना लाभलेल्या सर्वसुखाची व बोधाची सिद्धि त्यांनी ऋणाईत करून लेला श्रीसाई-सहज भक्तांचा ( वैष्णवांचा ) दास होतो. बी पेरलें कीं, तें वणारच. त्याप्रमाणें अक्षरें वाचली, गाईलीं, ओळखलीं कीं, त्या अक्षरांची सिद्धि ट होते. त्या वचनांचा बोध, सुख आणि ऐश्वर्य, बीजाप्रमाणें उमलून वाहूं गलेंच म्हणून समजावें. अक्षर वाचतांना, पहातांना ज्यांना हा दृढविश्वास च खरा भाव होय. बीजाचा संचय प्रभूसाई आपल्या प्रियरक्षणाच्या भावानें सतत करीत आहे. त्या रक्षणाच्याच बोधानें ( प्रियतेनें ) तें ज राखणें, त्याचा फलभार भोगणें हा संसार आहे. प्रत्येकाची आई त्याच्यापुरती ल्पतरुच आहे. पण जें वचन ( संतवचन, सद्‌गुरुवचन ) सर्वांच्या प्रियतेला पाझर डतें, तो श्रीसंतांचा जिव्हाळा विश्वाची माऊली आहे. म्हणूनच ते संतच खरे यबाप. त्या श्री संतांची श्रीसाई-विठ्ठल, पांडुरंग, श्रीराम, हीं गोड नामाक्षरे बीज ाणि फळ होत. हें वचन गाणें, ही प्रियतेची खरी पूजा होय. या पूजेखेरीज इतर, र्तीतील पूजा हे निर्माल्य, कचरा होय. बापाची पुण्यतिथी म्हणजे श्राद्ध, त्याला लेले दान नव्हे. तर त्या प्रियरक्षणाचे, त्यांच्या सगुण अवतारांत जे प्रियसुखाचे ण्यप्रसंग आले, त्या पुण्यप्रसंगाचा जप होय. जो बाप संतवचनामध्यें आपला सतत ंगाति आहे त्याचा प्रियजप केव्हां संपावयाचा ? त्याचें रक्षण थांबले नाहीं, पुरें ाले नाहीं; अर्थात त्याचे प्रियगुणगान-ही पूजाही कधीं थांबण्यासारखी नाहीं.

श्रीसाईचें रक्षण अखंड आहे, त्या प्रियरक्षणाचा बोध संतवचनांत अखंड जागा आ त्या रक्षणाचें व बोधाचें गुणगान मात्र जीवांत सतत उमलत रहावें हा भक्तिय शिल्लक उरतो.

ह. भ. प. कै. गणेश दामोदर उर्फ दादा केळकर यांना, श्री साईबाब शिरडीसच कायमचे ठेवून घेतले होते, आणि त्यांचेहि मन तेथें रमले होते कीं, कांहीं केल्या शिरडी सोडून जावें असें त्यांना कधींही वाटेना. त्य कुटुंब निवर्तले, तरी ते एकटेच शिरडीस राहत. त्यांचे मुलानें पुण्यास येऊन राहण विषयीं आणि त्यांच्या बहिणीनें वांईस येऊन राहाण्याविषयीं पराकाष्ठा केली, दादा शिरडी सोडून गेले नाहींत. मूळची प्रकृती साधारण अशक्त आणि अलि बरीच वर्षे दमेकरी असल्यामुळें त्यांच्या अंगांत विशेष त्राण राहिले नव्हते. श्रीसाईबाबांच्या समाधीपुढें श्रीरामायण व भागवत दोन तास नित्य वाचीत आ नंतर माशिदींत जाऊन श्रीबाबांच्या छबीपुढें दोन तास अति प्रेमळ, रसाळ व म भजन करीत. त्याशिवाय वाड्यांतही पहांटेस भजन करीत आणि दुपारीं पोथी वाचं एकंदरींत ते आपल्या काळाचा खरा खरा सद्व्यय करीत असत.

ते मूळचे वाईचे राहाणारे असून फार कर्मठ होते. ते एकादशी करीत अस एका एकादशीला श्रीबाबांनीं त्यांना बोलाविले आणि त्यांना म्हटलें, "दा कोन्हाळ्याला जाऊन दोन बोकड घेऊन ये म्हणजे आपण त्याची सागुती करं दादांनीं असले काम कधीं केलें नव्हते. तरी पण गुरुचीं अ शिरसामान्य करून, दादा कपडे घालायला घरीं गेले. कपडे घालून दादा मशि गेले तेव्हां महाराजांनीं त्यांना बोकड घेण्यासाठीं रुपये दिले, आणखी जा असें म्हणा दादा बाबांना नमस्कार करून निघाले. ते मशिदीच्या फाटकापर्यंत गेले तेव्हां बाब त्यांना फिरून हांक मारून म्हटलें, "दादा, तूं कशाला जातोस ? तुझ्याबरोबर ग आहेत त्या गड्यालाच पाठीव." दादा बरें म्हणाले आणि गड्याजवळ रुपये दे लागले. तेव्हां बाबा म्हणाले, "दादा अरे आज एकादशी ना आणि तूं ब्राह्म असून बोकड आणवून मला खाऊं घालतोस," आणि खूब हंसले आणि म्हणा "आपल्याला बोकडबिकड कांहीं नको." अर्थात् बाबांना बोकडाची गरज नस गुरु आज्ञेची युक्तायुक्तता पाहावयाची नाहीं या सत्वाचा बोध ठसवावयाचा होत बाबांच्या कृपेनें दादांच्या मनावर हा ठसलाच होता, पण बाबांच्या वरील लीले तुमच्या आमच्या मनावरही तो ठसो; हीच त्या दयाघन प्रभुसाईकडे प्रार्थना.

---

# भगवद्भक्त जयदेवस्वामी

**************************************

कलिकालाच्या प्रभावानें उत्पन्न होणाऱ्या चित्तभ्रष्टतेस भरतखंडांतील लोकांनीं बळी पडूं नये; तमोगुणाचें प्राबल्य होऊन आर्यजननीची संतती धर्मग्लानीच्या पटलानें अंध बनूं नये; आणि पापप्रवृत्त युगामध्यें धर्माचे तीन पाय नाहींसे झाले असले तरी आर्यावर्तांतील प्रजाजनांस नामसंकीर्तनाचें माहात्म्य समजून आत्मोद्धाराची किल्ली माहित व्हावी या हेतूनें या कर्मभूमीवर ज्या कित्येक वैष्णववीरांनीं जन्मधारण केले त्यांतच जयदेवस्वामींची गणना मोठ्या प्रमुखत्वानें होते. भगवान व्यासमहर्षींनीं जीं कित्येक पुराणें कथन केली ती फार गहन असल्याकारणानें त्यांचा खरा मथितार्थ अज्ञजनाच्या लक्षांत उतरावा तसा उतरत नाहीं. हें जाणून दीनांचा उद्धार करण्याकरितां प्रत्यक्ष परमात्म्यानें व्यास देवाना भूलोकीं अवतार धारण करण्याची आज्ञा केली. परमेश्वरी अनुज्ञेप्रमाणें श्रीव्यासानीं, जगन्नाथक्षेत्रासमीप असलेल्या तंदुबिल्व नांवाच्या एका ग्रामामध्यें ब्राह्मणवंशांत जयदेवरूपानें अवतार धारण केला. जयदेवाची बाल्यावस्था संपून तो थोर झालासें पाहून त्याच्या आईबापांनीं त्याचा व्रतबंध केला. जयदेवाला शिक्षण-संस्कार मुळींच नव्हता. विद्यामृताचा लाभ करून घेऊन आपल्या विद्वत्तेच्या कीर्तीनें दशदिशा आक्रमण करून टाकाव्या अशा इच्छेनें जयदेवानें कोणत्याही विद्यालयांत प्रवेश केला नाहीं; कोणत्याही अध्यापकाचें शिष्यत्व पत्करिलें नाहीं. अविश्रांत परिश्रम करून विद्वत्तेचा लौकीक मिळविलेल्या विद्वानाच्या ठिकाणीं ज्या गुणांच्या व ज्ञानाचा एक लेश सांपडणेंहि मोठ्या कष्टाचें पडतें, त्या गुणांत, ज्ञानांत कांहींएक अभ्यास न करितां केवळ अंतःस्फूर्तीनें जयदेव पराकाष्टेचा निपुण झाला. इहलोकीं मनुष्याला आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यायचें असेल तर त्यानें कोणत्या साधनाचा अंगिकार करावा याचा उलगडा करून घेण्याकरितां जयदेवानें श्रुति आणि शास्त्रें धुंडाळून असा सिद्धांत काढला कीं, कलियुगामध्यें हरिकीर्तनासारखे कल्याणकारक असें अन्य कोणतेंही साधन नाहीं. श्रीकृष्णानेंहि उद्धवाला परमेश्वराच्या भजनाचीच प्रौढी गाऊन दाखविली हें जाणून हरिलीला वर्णन करण्याच्या लालसेनें जयदेवानें गीतगोविंद नांवाचे काव्य रचिलें. या काव्यांत राधाविलास आणि गोकुळांतील श्रीकृष्णाच्या क्रीडा यांचे वर्णन केलें आहे. परमेश्वराच्या अनुपम्य गुणासारखा विषय आणि जयदेवासारखा प्रासादिक काव्यकर्ता अशी जोड जमली असल्याकारणानें गीतगोविंदांत काव्यरस उचंबळून जाणें साहजीकच आहे. राधाविलास आणि जयदेवाची पद्य-रचना म्हणजे सुवर्णाच्या कंकणास रत्नकोंदण प्राप्त झाल्यासारखेंच

आहे. मग तेथली शोभा काय विचारावी ! एका ठिकाणीं स्थित असलेल्या सुवाधिक पुष्पांचा परिमळ जसा आपल्याआपुण भूमंडळावर धावतो त्याप्रमाणें गीतगोविंद ग्रंथानें थोडक्यांतच सर्व लोकांचें चित्त वेधून टाकलें. घरोंघरीं गीतगोविंदाचे पाठ सुरू झाले. जगन्नाथ येथें सात्विक या नांवाचा एक राजा वास्तव्य करीत होता. त्याच्या कानावर जयदेवाचा हा लौकीक गेला. सात्विकाच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन त्याला जयदेवाची कीर्ति सहन होईना. त्यानेंही एक दुसरा ग्रंथ तयार केला आणि आपल्या तोंडानेंच आत्मकृतीची फुशारकी सांगून सर्व लोकांनीं गीतगोविंद न वाचतां आपल्या ग्रंथाचे पाठ करावेत असा हुकूम सोडला. विद्या, हरीकीर्तन, ब्रह्मज्ञान, गुरूमंत्र या सारख्या गोष्टींचा स्वीकार करण्याकरितां जबरदस्ती केली असतां त्या गोष्टींचें मोल कमी होतें; आपल्या मुखानेंच आपल्या चातुर्याचे गोडवे गाइल्यानें आपल्या पदरीं उलट मूर्खपणा येतो. या गोष्टी तो सात्विक राजा जाणत नव्हता. तो अहंतेनें भरून गेला होता. जयदेवाचा पाडाव करण्याकरितां त्यानें आपल्या ग्रंथांतही हरिलीलांचेंच वर्णन केलें. होतें त्या वेळच्या विद्वानांस राजाची आज्ञा मान्य होईना. त्यांना राजाचा ग्रंथ पसंत पडेना. जयदेवाच्या ग्रंथापासून त्यांचे मानस चलित होईना. सात्विक राजाही आपला आग्रह सोडीना. अखेर असें ठरलें कीं, श्रीजगन्नाथाच्या देवालयांत दोन्ही ग्रंथ देवापुढें ठेवावेत. जगन्नाथराय ज्याचा स्वीकार करतील तो ग्रंथ स्वीकारण्यास योग्य मानावा व ज्याचा त्याग करतील तो त्याज्य समजावा. ठरल्याप्रमाण प्रचीति पाहण्याकरितां रात्रीं दोन्ही ग्रंथ देवालयांत ठेवून सर्वांसमक्ष देवालयास बाहेरून कुलूप घालण्यांत आलें. आणि झाडून सर्व मंडळी आपापल्या घरीं चालती झाली. काकडार्तीच्या वेळीं सर्व मंडळी समूहानें त्या ठिकाणीं दार उघडण्यास प्राप्त झाली तों जगन्नाथरायांनीं सात्विक राजाचा ग्रंथ देवळाबाहेर फेकून दिलेला दिसला. क्षीर–नीराचा चांगलाच निवाडा झाला. सुवर्ण आणि बेगड, चंदन आणि हिंगण, वेदांत आणि कोकशास्त्र इत्यादि द्वंद्वांची परस्पर साम्यता होणें शक्य नाहीं अस सांगून लोकांनी राजाची निर्भत्सना केली. सात्विक राजासही आपल्या मत्सरी कृत्याचा पश्चात्ताप वाटला. तो लज्जायमान झाला. सर्व गर्व सोडून देऊन तो मोठ्या लीनतेनें जगन्नाथासमोर हात जोडून उभा राहिला. त्यानें जयदेवा-विषयीं दुर्बुद्धी सोडून देऊन परमेश्वराचें स्तवन केलें. सात्विक राजानें जयदेवाविषयींचा दुर्भाव टाकिला आहे असें जाणून करुणाकर परमेश्वरानें त्याच्यावर कृपा केली. भक्तवत्सल नारायणानें राजाच्या ग्रंथांतून चोवीस श्लोक निवडून काढून ते आपल्या हातांनीं जयदेवाच्या गीतगोविंदांत लिहून ठेविले. अशा रीतीनें दयाळू जगन्नाथनें आपला अंगिकार केला यांत समाधान मानून सात्विकराजा आनंदित झाला. तो जयदेवाचे महात्म्य ओळखून राहिला.

त्याच जगन्नाथक्षेत्रामध्यें कोणीएक अग्निहोत्री ब्राह्मण राहत असे. त्याला पद्मावती नांवाची एक कन्या होती. ही पद्मावती मोठी सद्‌गुणी असून अपूर्व लावण्यानें संपन्न होती. पद्मावतीचें सौंदर्य पाहून तिला मोठमोठ्याकडून अनेक मागण्या आल्या; परंतु तिचा बाप कोणाचीही मागणी कबूल करीना. पद्मावती ही कोणासच अर्पण करावयाची नसून तिला आपण कृष्णार्पण केली आहे असा तिच्या बापानें सर्वांना स्पष्ट जाब दिला. कांहीं दिवस गेल्यानंतर पद्मावतीच्या बापास दृष्टांत झाला. जयदेवकवि हा परमेश्वराचा अंश असल्याकारणानें सालंकृत कन्यादान करून पद्मावती जयदेवाला देण्याबद्दल प्रत्यक्ष परमेश्वरानें सांगितल्यामुळें पद्मावतीच्या पित्यानें पद्मावतीचा जयदेवाबरोबर यथासांग विवाह केला. परमेश्वर प्रसादानें प्राप्त झालेल्या बहुगुणशाली पत्नीसमवेत जयदेवस्वामी प्रपंच करूं लागले. आपल्या धर्मपत्नीसह नित्य हरिगुण कीर्तनांत शरीर झिजवीत असतां जयदेवाची एका श्रीमंत सावकाराशीं भेट झाली. हा सावकार परम भाविक, उदार, गुरुसेवातत्पर आहेसे पाहून जयदेवास सावकाराबद्दल प्रेम वाटूं लागलें. सावकाराच्या अंतःकरणात सात्विकीभाव उचंबळून आल्याकारणानें त्यास जयदेवाला आपल्या स्वतःच्या घरीं नेण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यानें जयदेवास आपली इच्छा प्रगट करून दाखविली. त्याची विनयसंपन्न भक्ति पाहून जयदेव त्याच्याबरोबर त्याच्या गृहाप्रत गेले. सावकाराच्या नगरांत गेल्यानंतर आपल्या कीर्तनानें जयदेवानें जड, अज्ञान व दुराचारी अशा मनुष्यांनादेखील भक्ति–मार्गास लाविलें. त्याठिकाणीं एक मास वास्तव्य केल्यानंतर जयदेवांनीं आपल्या घरीं परत जाण्याचा हेतु दर्शविला. जयदेवस्वामी परत जाण्याकरितां निरोप मागतात असें पाहून सावकारानें स्वामींना कनकासनावर बसवून त्यांची पूजा केली. स्वामींचा अनुग्रह घेऊन सावकारानें जयदेवाची यथासांग बोळवण केली. गुरुदक्षिणा म्हणून तो सावकार जयदेवाला सोनें, मोतीं, रत्नें अर्पण करूं लागला. पण ज्यांचें चित्त सर्वकाळ ब्रह्मानंदांत निमग्न होऊन राहिलेलें त्यांना सोन्यामोत्यांची काय प्रतिष्ठा वाटणार ? जयदेवस्वामी दक्षिणेचा स्वीकार करीत नाहींत, एकांतांत उपदेश करून त्याची तंतोतंत किंमत चोपून घेणाऱ्या गुरुंत आणि जयदेवस्वामींत जमीन अस्मानाचें अंतर आहे असें पाहून सावकारास गहिंवर दाटला. जयदेवाशीं होणारा वियोग त्या सावकारास असह्य झाला. स्वामींचा गमननिर्धार पाहून त्यानें स्वामीस मोठ्या नाखुषीनें निरोप दिला. त्यानें स्वामीस नकळत गुरुमातेस देण्याकरितां म्हणून कांहीं द्रव्य पाठविण्याची गुप्त तजवीज केली. सावकारानें स्वामीच्याबरोबर आपला एक मनुष्य दिला. त्याच्याजवळ गुप्ततेनें नानाप्रकारचीं रत्नें व मोत्यें देऊन सावरकरानें स्वामीची रवानगी केली.

जयदेवाच्या प्रयाणावर दोन चोरांनीं पाळत राखली होती. जयदेवाबरोबरच्या कारकुनाबरोबर गुरुमातेस अर्पण करण्याकरितां सावकारानें अमूल्य रत्नें दिलीं आहेत

याबद्दल त्या तस्करांनीं बातमी काढली होती. तेव्हां हा लाट मारावा या दुष्ट हेतूनें ते दोन भामटे जयदेवाच्या मागोमाग प्रवासास निघाले. थोडासा मार्ग चालून गेल्यानंतर बरोबरच्या कारकुनानें आपल्या घरची मोठी चडचण सांगून तेथूनच स्वगृहीं परत जाण्याबद्दल स्वामींची परवानगी मागितली. पशु, दास, दासी, कांत इत्यादिकांचें जिणें सर्वस्वी पराधीन आहे असें ध्यानांत आणून जयदेवानें सहृदयमनानें त्य कारकुनास तेथूनच परतण्याबद्दल रुकार दिला. जयदेवांनीं स्वतःच रथ हाकण्याचें काम चालविलें. जयदेव एकटाच चालला आहे अशी खात्री करून घेऊन ते दोन कुटिल चोर प्रगट झाले. त्यांनीं एकदम जयदेवास नमस्कार ठोकिला. गंगातीर वेष्टून बसणाऱ्या बकाप्रमाणें असलेली त्यांची वृत्ति ओळखून जयदेवास असें वाटलें कीं दोघेजण तस्कर असावेत. ते दोघे मार्गांत कांहीं भाषण सुरू करणार तों जयदेव आपण होऊनच त्यांना म्हणाला, “पांथस्थ हो; तुमची काय इच्छा असेल ती मी पूर्ण करीन नानाप्रकारचीं वस्त्रें, अलंकार, रत्नें यांनीं हा रथ भरलेला आहे. त्या सर्व द्रव्यासह हा रथ मीं तुम्हांस अर्पण केला आहे.” इतकें सांगून जयदेव रथाचा त्याग करून एकटाच पुढें चालता झाला.

द्रव्यापाशीं अति अनर्थ राहतात; द्रव्यामुळेंच प्राणघात होतात अशा समजुतीनें जयदेव रथ सोडून पळाला असें पाहून ते शेठ आनंदित झाले. त्यांनीं तो रथ आपल्या ताब्यांत घेतला. पण त्यांच्या मनास तसें निर्भय वाटेना. जयदेव रथ सोडून गेला असला तरी त्यानें आपल्याला पाहिलें आहे. तो आपले चेहरे ध्यानांत ठेवून सावकारास चोरीची वर्दी देऊन आपणास हुडकून काढील अशा भयानें त्या चोरांनीं धडाधड रथ चालवून जयदेवास पुनरपि गांठलें. त्या दुष्ट तस्करांनीं निष्ठुरपणानें जगदेवाचे हातपाय तोडिले आणि त्यास एका पेवांत टाकून देऊन ते क्रूर नरपशु आपल्या वाटेनें चालते झाले.

पेवामध्यें पडल्यानंतर जयदेवांनीं असा विचार चालविला कीं, आत्माराम हा सुखदुःखापासून अलिप्त असून घात किंवा नाश हा देहाच्याच माथीं आहे. देह हा सकळ रोगांचें घर आहे. देह कामक्रोधांचें मूळ आहे. त्रिगुणांचे विकार जन्म पावण्यास हा देहच कारण होय. अशा प्रकारच्या दिव्य ज्ञानानें प्रेरित होऊन त्या विपन्नावस्थेंत जयदेव देहातीत होऊन राहिला. एका भगवन्नामोच्चरणावांचून त्याच्या मनाचे सर्व व्यापार बंद राहिले. केवढें हें अनुपम सामर्थ्य! केवढी ही भक्तिप्रचुरता!

अशा स्थितींत जयदेवस्वामी नामस्मरणांत गर्क होऊन राहिले असतां त्या अरण्यांत क्रौंच नांवाचा राजा शिकारीकरतां प्राप्त झाला. शिकारीच्या नादांत राजाचा सर्व दिवस निघून गेला. अंधारी रात्र दाटून राहिली. त्या काळोखांत राजा मार्गक्रमण करीत असतां तो अकस्मात् त्या पेवासन्निध येऊन पोंचला; तों त्या पेवांतून उत्पन्न

होणारा रामकृष्ण नांवाचा मंजुळ ध्वनी त्याच्या कानाशीं येऊन धडकला. क्रौंच राजा आश्चर्य पावून आपल्या घोड्यावरून खालीं उतरला; आणि जिज्ञासातृप्तीच्या आतुरतेनें त्यानें त्या कूपांत वाकून पाहिलें; तों परम तेजस्वी, असा कोणी विष्णुभक्त पेवामध्यें ध्यान धरून बसला असून त्याच्या देदिप्यमान कांतीनें सर्व पेंव प्रकाशमान झाला आहे असें पाहून तो भाग्यवान क्रौंच राजा विस्मयानें थक्क झाला. त्यानें तेथल्यातेथेंच जयदेवास प्रणिपात घातला. उजेडामध्यें बारीक नजरेनें पाहतां राजाला असें दिसून आलें कीं, आंतील महात्म्यास हातपाय नाहींत. तेव्हां आश्चर्यान्वित होऊन राजानें जयदेवास प्रश्न केला कीं, "स्वामी, आपणाला अशी अवस्था कशानें घडली बरें ?" यावर जयदेवानें सांगितलें. "मी जन्मतःच असा आहे ! मी उपजल्यापासून करचरणरहितच काय पण सर्व इंद्रियारहित आहे."

जयदेवाच्या या उत्तराचा खरा अर्थ ध्यानांत घेऊन क्रौंच राजास प्रेमाचें भरतें आलें. त्यानें जयदेवास वर काढिलें आणि शिबिकेंत बसवून आपल्या भृत्यगणासहवर्तमान तो क्रौंच राजा आपल्या राजधानीस निघून गेला.

आपण आपल्या बरोबर आणलेला जयदेवस्वामी पूर्ण ज्ञानी असा विष्णुभक्त आहेसें जाणून राजानें त्याला आपल्या सिंहासनावर बसवून त्याचा अनुग्रह घेतला. एके दिवशीं राजानें स्वामीला कांहीं साधन विचारण्याची इच्छा दर्शवून आपणांस एखादी सेवा सांगण्याविषयीं विनंति केली. जयदेवानें राजाला संतभक्ति करण्याची आज्ञा केली. संतसेवेवांचून आत्मतारणाचा दुसरा उपाय नाहीं असें सांगून जयदेवानें क्रौंच राजाला संत—लक्षणांचे निरूपण करून सांगितलें. जयदेवाच्या आज्ञेप्रमाणें राजानें संतसेवा आरंभिली. क्रौंच राजाच्या मंदिरांत संतांचा आदर होऊं लागला; इच्छाभोजनें मिळूं लागली. वस्त्रें, द्रव्य, रत्नें इत्यादि उपचारांनीं संतस्वरूपीं अभ्यागतांचा मोठा परामर्ष होतो अशी कीर्ति ऐकून राजमंदिरांत अनेक प्रकारच्या संतांची गर्दी जमूं लागली. त्या ठिकाणीं अशी पद्धत पडली कीं, याचनेकरितां येणाऱ्या याचकांनीं प्रथम जयदेवाचें दर्शन घ्यावें आणि नंतर राजाची गांठ घेऊन इच्छित वस्तु प्राप्त करून घेऊन निघून जावें.

असें होतां होतां, ज्या चोरट्यांनीं जयदेवाचे हातपाय तोडून टाकले होते त्या नष्ट खळांनीं संतसाधूंचीं रूपें धारण केली. लांबून पाहिलें असतां थेर जसे कर्दळीप्रमाणें हिरवे दिसतात त्याचप्रमाणें बाह्यरंगी साधूच्या आविर्भावानें शोभणारे ते दोघे संत क्रौंच राजाच्या दर्शनाकरितां प्राप्त झाले. हातामध्यें माळा धारण करून आणि विरक्तपणाचा डौल आणून ते दोघेजण राजदर्शनाच्या इच्छेनें सिंहासनापुढें प्राप्त होतात तों त्यांनीं सिंहासनावर राजाच्या ऐवजीं जयदेवास पाहिलें.

ज्याचे हात पाय तोडून ज्याला आपण पेवांत टाकून दिलें त्या जयदेवास राज-सिंहासनस्थ पाहून ते चोर मनामध्यें भिऊन, परस्परांची दृष्टादृष्ट होतांच परस्परांना आपापल्या कर्मांची खूण पटली. आतां आपण जयदेवाच्या तडाक्यांतून सुटत नाहीं, क्रौंच राजाकरवी आपला नाश झाल्यावांचून राहत नाहीं; अशा भयानें गांगरून त्या दोघांना त्यांचे स्वर्गस्थ पितर दिसावयास लागले. बरोबरच आहे; नीचकर्मास वाहिलेल्या त्या पुरुषपशूंना संतांच्या हृदयाची ओळख कोठून असणार? संतांच्या अंगांत क्षमाशांति बाणून गेलेली असते, ते पराचे दोष जाणत नाहींत; त्यांना सर्व वस्तु ब्रह्मरूप भासतात, सर्वांभूतीं निर्वैर राहून ते सहज स्थितीनें प्रपंच चालवून अखंड समाधीचा अनुभव घेत असतात, हें त्या तमोगुणप्राधान्य भामट्यांना काय ठाऊक? प्राणाच्या भयानें गांगरून ते दोघेजण बतावणी कशी करावी किंवा पळून कसें जावें या विचारांत गोंधळले आहेत तोंच जयदेवस्वामींनीं सिंहासनावरून खालीं उडी ठोकली. त्या दोघां नाटकी संतांना आलिंगन देऊन जयदेवांनीं सेवकांस सांगितलें, "जा; राजाला संतसत्कार करण्याविषयीं सूचना करा" जयदेवाच्या आज्ञेप्रमाणें क्रौंच राजानें या दोघां संतांचा बहुमान करून त्यांची सेवा करण्याकरितां त्यांस राजमंदिरीं ठेवून घेतलें.

त्या दोन्ही बेगडी साधूंनी चंगळ सुरू झाली. पण त्यांना समाधान कसलें तें वाटेना. गळाला लावलेली उंडी गिळतांना माशाला मोह पडतो; पण गिळण्याची क्रिया करतांना कंठाला गळ टोचला म्हणजे सर्व सुख समजतें; त्याप्रमाणेंच या दोन्ही कुलांगारांची अवस्था झाली. त्यांना हृद्रोग लागला. ते अगदीं कृश झाले. केव्हांतरी आपले प्राणांचे बळी पडणार अशा भावनेनें ते क्षयरोगानें पछाडल्याप्रमाणें निस्तेज व प्रेतरूप दिसूं लागले.

त्या वेषधारी संतांची ही दशा पाहून राजानें जयदेवास प्रश्न केला. "स्वामी, इतर संतांचा आपण दुरूनच आदर करिता आणि या वैष्णवांना आपण उडी ठोकून गाढालिंगन दिलें याचें कारण काय बरें? खेरीज आम्ही त्यांना राजभोग अर्पण करीत असतां ते दोघे भक्त असे खंगत कां चालले आहेत?"

यावर जयदेव बोलला "हे दोघेजण सर्वांहून अति विरक्त आहेत व त्या पूर्ण विरक्तीमुळेंच त्यांना राजविलास मानवत नाहींत. आतां ते येथून जाण्याची इच्छा दर्शवितील तर मोठ्या प्रेमानें त्यांची पूजा करून त्यांना जाऊं द्या.

नंतर कांहीं दिवसांनीं त्या वेषधरांनीं राजाचा निरोप मागितला. जातेसमयीं राजानें त्यांची इच्छा विचारली. त्या कापट्यसागरांनीं निर्लज्जपणानें अपार द्रव्याची याचना केली. राजानें ती गोष्ट जयदेवास विदित करून त्यांची यथास्थित रवानगी

केली. राजानें त्यांच्याबरोबर द्रव्य व कांहीं दूत दिले. ते पापी जन आपल्या संकेत स्थळाकडे जाऊं लागले असतां वाटेनें मध्यंतरी राजदूतांनीं त्यांना विचारलें कीं, "आमच्या सरकारच्या मंदिरांत अनेक संतजन येतात. पण त्यांच्यापेक्षां जयदेवस्वामी व राजा यांची तुमच्यावर अधिक कृपा दिसली. यांतील मतलब काय असावा बरें ?" दूतमुखांतून हा प्रश्न सहज निघाला. पण हा प्रश्न फार महत्त्वाचा होता. या प्रश्नावरील उत्तरानेंच त्या वेषधारी भैंदांच्या मनुष्यत्वाची परीक्षा व्हावयाची होती. ज्याला आपण अपकार केला त्या जयदेवस्वामीनी आपल्या अपकारकर्त्यांशीं कोणती वृत्ति ठेविली याचें मर्म न जाणतां ते दोघे चांडाळ आपल्या जातीवरच गेले. राजमंदिरांतून निसटल्याकारणानें आतां आपण सुटलों असें भावून त्यांनीं दूतांच्या प्रश्नास बेलाशक उत्तर केले कीं, "तुमचे स्वामी पूर्वाश्रमांत असतांना आमचे स्नेही होते. आम्ही व ते एका राजाचे आश्रित होतों. जयदेवाकडे प्रधानकी होती. आम्ही हाताखालचे दास होतो. एके प्रसंगीं कांहीं अपराधावरून जयदेवावर राजाचा कोप होऊन त्याला अरण्यांत नेऊन ठार मारण्याबद्दल आमची योजना झाली. त्यावेळीं आम्ही दयाळू होऊन जयदेवाचा प्राण न घेतां नुसते हातपाय तोडून ते राजास दाखविण्यास नेले. अशा प्रकारें आम्ही जयदेवावर जीवदान देऊन जो उपकार केला त्याबद्दल जयदेवानें कृतज्ञ होऊन आम्हांवर जास्त मेहेरबानगी केली. जयदेवाचे करचरण तोडल्याबद्दली आम्हास पश्चात्ताप झाल्यामुळें आम्ही वैराग्याचा अंगिकार करून तीर्थाटन आरंभिलें." त्या नटवेषी यात्रेकरूचें भाषण संपतें तोंच त्या ठिकाणीं परमेश्वरी साक्षात्कार घडून आला. त्यांना आपण आपल्या नष्ट क्रियेची उत्तम संपादणी केली असें वाटलें. पण आपण पुन्हा असत्य बोललों ही गोष्ट त्यांचे ध्यानींमनींही नव्हती. आपल्या चातुर्यपूर्ण वाणीबद्दल त्यांचें त्यांना कौतुक वाटलें. पण या सृष्टींत असत्यापेक्षां जास्त बलवत्तर असें दुसरें पातक नाहीं ही गोष्ट विचाऱ्यांच्या मनाला शिवलीही नाहीं. त्यांनीं जीं दुष्ट कर्में केलीं होतीं त्यांत सांप्रतच्या असत्यप्रतिपादनाची भर पडून त्यांच्या पापाचा घडा पूर्ण भरला. ते ज्या धरित्रीवर उभे होते ती धरणीमाता पापभारामुळें थरथर कांपून एकदम उकलली आणि तिनें त्या दुरात्म्यांना गिळंकृत केलें !

हा चमत्कार पाहून ते दूतगण घाबरून गेले. त्यांनी राजधानीस परत येऊन जयदेवास तो सर्व वृत्तांत विदित केला. जयदेवाच्या ठिकाणीं जर कोणी सामान्य पुरुष असता तर त्याला तो चमत्कार ऐकून मोठें आश्चर्य व समाधान वाटलें असतें. एखादा विद्वान असता तर तो आपल्या दुष्मनांच्या नाशाबद्दल आनंदित होऊन त्यांतील अद्‌भुतपणाबद्दल साशंक होऊन राहिला असता ! एखादा न्यायी सुजन असता तर त्याचा परमेश्वरी न्यायाबद्दलचा विश्वास दृढ झाला असता ! एखादा

धर्मभोळा असता तर तो नीच कृत्यापासून स्वतः जास्त सावध राहिला असता. पण जयदेवस्वामींची गोष्ट या सर्वांहून भिन्न होती. तो महाभागवत होता. तो पूर्णपदास पोंचलेला होता. तो सात्विकवृत्तींतील मुगुटमणी होता. दूतमुखांतून त्या संतांची—तस्करांची नाशवार्ता ऐकून जयदेवास गहिंवर आला. त्याचें अंतःकरण सद्गदित झालें. सात्विकीभाव उचंबळून येऊन तो परमेश्वरास उद्देशून बोलला, "हे पतित-पावना श्रीकृष्णा; तूं माझ्या शत्रूंस अधोगतीला कां नेलेस ? रावण हा तुझा विरोधी-भक्त असूनही तूं त्याला सायुज्य दिलेंस ? तुला शिव्या देणाऱ्या शिशुपालासही तूं मुक्ति दिलीस ? कंस, चाणूर, पूतना इत्यादिकांनाही तूं मोक्षसदनाप्रत नेलेंस आणि या जयदेवाच्या—तुझ्या अनन्य दासाच्या तुझ्या दीन, दुबळ्या भक्ताच्या—शत्रूंना तूं अधोगतीला कसें नेलेंस ? " जयदेवाचीं अशीं करुणावचनें ऐकून परमात्मा संतुष्ट झाला. प्रत्यक्ष महाविष्णूनें जयदेवास दर्शन दिलें. भगवानाच्या दर्शनसामर्थ्यानें जयदेवास लागलीच हात पाय फुटले. जयदेव विनीत होऊन श्री विष्णुपुढें हात जोडून उभा राहिला. तेव्हां विष्णु बोलले "जयदेवा; तुझी भक्ति धन्य आहे. क्षमा, दया आणि शांति यांचा तूं मूळकंद आहेस. शत्रुमित्रांविषयीं जो समभाव धारण करतो त्याच्या आधीन परमेश्वर असतो हें सत्य करून दाखविण्याकरितां मला प्रगट व्हावें लागलें." इतकें सांगून विष्णु गुप्त झाले.



# आपुलें आपुल्यासंगें

( लेखक द. शं. टिपणीस )

श्रीसाईसच्चरित्राच्या ४५ व्या अध्यायांत एक लहानशी घटना दिली आहे. घटना अगदीं लहान साधी आहे. वाचतांना तिच्यात कांहीं महत्त्वाचें आहे असें वाटत नाहीं. परंतु तिच्यांत बाबांचे सहज उद्गार म्हणून दिले आहेत ते तिचे सारसर्वस्व आहे. ज्या गोष्टीला अर्जुनाला प्रवृत्त करण्यासाठीं, तूं कोण, तुझें कार्य काय हें त्याच्या ध्यानी आणून देण्यासाठीं व तें तूंच कां करावें हें त्याच्या सर्व शंकाकुशंका घालवून त्याला पटवून देण्यासाठीं, त्याच्या मनावर ठसविण्यासाठीं व अर्जुनाच्या निमित्यानें अखिल मानवजातीला जाणीव देण्यासाठीं कृष्णानें गीता सांगितली ती गोष्ट अगदीं साध्यासुध्या आपण ज्याला रांगडे म्हणूं, अशा मराठींत बाबांनी या घटनेंत व्यक्त केली आहे.

ती घटना अशी—एकदां बाबा, भगत व काका दीक्षित बोलत बसले होते. शिर्डींत आल्यावर बाबा आढ्याला चिंध्यांनीं टांगलेल्या वीतभर फळीवर झोपत असत. त्याबद्दल विषय निघाला. तेव्हां आपल्या त्या फळीची महती बाबांनी सांगितली. ६०-७० चादरींच्या बिछाईतीपेक्षां फळीच कशी आपणांस प्रिय आहे हें बाबांनीं सांगितलें. तें ऐकून काका दीक्षितांना वाटलें कीं, तशी बिछाईत पुन्हां बाबासाठीं करून द्यावी, व तसें त्यांना सांगितलें. तेव्हां बाबा म्हणाले, “अरे मी त्यावेळीं एकटा होतों. आतां भगत माझ्या सोबतीला आहे. त्याला खाली टाकून मी काय एकटाच उंच फळीवर झोपूं? काका म्हणाले, मी आणखी एक फळी टांगून देतों. एका फळीवर तुम्हीं झोपा व दुसरीवर भगत झोपेल. तेव्हां बाबा हसून म्हणाले, “तो काय निजतो फळीवर? जो डोळे उघडे ठेवून जागा राहील तोंच फळीवर निजेल. त्रिगुणांचा लय झाला असेल तोंच हें करील. फळी ही बिछाईत माझीच. भगत भरीस पडेल तर नुकसान पावेल. मी जें करीन तें तो करूं शकेल काय? ‘आपुलें आपुल्या-संगें, दुजियाचें दुजिया संगें.’

आपुलें आपुल्या संगें, दुजियाचें दुजिया संगें. बोलतां बोलतां सहज केलेला हा बाबांचा उपदेश. त्यावर विचार करूं लागले तर लाख लाख मोलाचे विचार त्यांतून बाहेर येतात. श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलें कीं, स्वधर्मे निधनं श्रेयः

परधर्म भयावहः आणि बाबा म्हणाले, आपुलें आपुल्या संगें, दुजियाचें दुजियासंगें विचार करा. तुलना करा म्हणजे साम्य कळेल व हळूं हळूं कितीतरी गोष्टी ध्यानांत येतील. दिवाळीच्या दारुकामांत साप म्हणून बारीक बारीक कांड्या असतात. मुलांना त्यांत मोठी गंमत वाटते. एक लहान कांडी पेटविली कीं तिच्यांतून लांबलचक सर्पाकृति हळूं हळूं बाहेर येते. तसेंच हें कृष्णाचें वा बाबांचें म्हणणे. लहानशीच कांडी पण तिला विचाराची धग लावलीत तर त्यांतून जीवनाच्या उत्तोमत्तम तत्त्वज्ञानाची भेंडोळी बाहेर येतात, व ही भेंडोळी उकलतां उकलतां मोठमोठ्या पंडितांची धांदल उडते. त्यांच्यांत एक मत न झाल्यामुळें वादावादीला जोर येतो. यामुळें सामान्य माणूस गीता म्हणजे कांहींतरी भयंकर आहे कीं त्यामुळें पंडितांची डोकीं भडकतात असें समजून कशाकडे कांहींच लक्ष देत नाहीं. बहुतेक धर्मग्रंथांच्या बाबतींत असाच कांहींसा प्रकार होत असतो. वादावादीच्या धुमश्चक्रींत अहंकाराचें फावल्यामुळें तो आपलें अर्थ वा उपपत्त्या घुसडून देतो व मूळ मुळांत राहून पाचोळा तेवढा वादाच्या वाऱ्याबरोबर उडत रहातो व सामान्य माणूस असल्या पाचोळ्यालाच जीवनाची मुळी समजून चालतो. कारण भाषेच्या बाबतींत सामान्य माणसाला प्रौढत्व आलेलें नसल्यामुळें धर्मग्रंथांत काय आहे याचें त्याला आकलन होत नाहीं व विद्वान् म्हणतील तें तो प्रमाण धरून चालतो. यामुळें संत वा श्रेष्ठ विभूती वेळोवेळीं अवतरून लोकांच्या भाषेंत सर्व तत्त्वज्ञान आणून त्यांना मार्गदर्शन करतात.

आपल्या सर्व आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचें माहेरघर म्हणजे उपनिषदें. पण माहेरचा विसर पडून बुद्धि संशय चक्रावर फिरूं लागल्यामुळें भगवद्गीतेचा अवतार झाला. तिचाच मराठी अवतार म्हणजे ज्ञानेश्वरी. तिचेंच अधिक सुलभ रूप म्हणजे एकनाथी भागवत. त्यांतूनच साईचरित्रांतील तत्त्वज्ञान आलेलें व या तत्त्वज्ञानाचें मूर्तिमंत रूप म्हणजे श्रीसाईबाबा. गीतेंतील तत्त्वज्ञान व्यवहारांत उतरविणारा गीतेनें वर्णिलेला स्थितप्रज्ञ म्हणजे साईबाबा. सर्वसाधारण समाज देवभाषेमुळें गीतेंतील तत्त्वज्ञानास वंचीत राहिला तेव्हां गीतेचा संदेश घरोघरीं पोहोंचविण्यासाठीं गीता ज्ञानेश्वरीच्या रूपानें मराठींत आणण्याचें त्या काळचें अग्रगण्य कार्य ज्ञानदेवानें केलें. परंतु कालांतरानें सर्व तत्त्वज्ञान ग्रंथांतच बंदिस्थ राहिलें; कारण लोकांकडून ते व्यवहारांत उतरविलें जाईना; तेव्हां अध्यात्म व व्यवहार यांची सांगड घालण्याचें कार्य एकनाथांनीं केलें. एकनाथानंतर तेंच कार्य समर्थ रामदासांनीं केलं व अगदीं अलिकडील काळांत साईबाबांनीं केलें व स्थितप्रज्ञ होऊनही व्यवहार कसा करतां येतो हें प्रत्यक्ष दाखविले व गीतेंतील तत्त्वज्ञान भोळ्याभाबड्या जनतेला उघड केलें. स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्म भयावहः यावर पुष्कळ वाद झाले. धर्म म्हणजे काय याभोंवतीं वाद फिरत राहिले. वादावादी हा पंडिताचा धंदा तर अध्यात्म लोकांना समजेल अशा भाषेंत व मनो-

रंजक रीतीनें सांगणें हा संतांचा धंदा. या कामीं देवानें नामदेव तुकारामादी संतसेनाच निर्माण केली व या सेनेनें भागवत धर्माचा कायम ठसा महाराष्ट्रीय अंतःकरणावर उठवला. पण आजच्या जमान्यांत संतांचें तें मराठी समजेनासें झालें. नवीन काळास योग्य अशी त्याची फोड न झाल्यामुळें सर्वसाधारण जनतेला त्याचा दैनंदिन जीवनांत कसा उपयोग करावा हें कळेनासें झालें. अध्यात्म म्हणजे केवळ पंडितांनीं वादविवाद करण्याचें रणांगण नसून रोजच्या जीवनांत आणावयाची ती तत्त्वप्रणाली आहे. धर्म फक्त देवळांत व स्वयंपाकघरांत इतर व्यवहारांत त्याचा संबंध नाहीं हा जो कांहीं समज गेले कांहीं शतकें आमच्यांत रूढ होऊन बसला आहे व जो अजूनही आहे तो योग्य नव्हे. धर्म व मानवी जीवन हीं निराळीं करतां येत नाहींत. धर्मावरच जीवनाचें अधिष्ठान आहे. साखरेंत जशी गोडी तसा जीवनांत धर्म मिसळला आहे, साखरेंतून गोडी काढून घेतली तर मग तिचें साखरपण तें काय राहिलें? जीवनांतून धर्म काढून घेतला तर मग तें जीवन गोडीशिवाय साखर व रसाशिवाय फळ होऊन त्याला मूल्य राहणार नाहीं. धर्म व जीवन हे एकांत एक मिसळलेले आहेत. जीवनांत धर्म पाहिजे व धर्मांत जीवन पाहिजे. काळ बदलतो, भाषा बदलते, लोकांचे विचार बदलतात अर्थात् त्याबरोबर अध्यात्मिक आचार पद्धतीही बदली पाहिजे म्हणून संतांची आवश्यकता समाजाला असते. म्हणून बाबांनीं गीतेंतील कर्मयोग व भक्तियोग आजच्या काळास अनुरूप होईल अशा प्रकारें सांगितला आहे. तत्त्व जुनेच पण भाषा बदलून कसें येत असतें व का येत असतें याचा विचार येथवर झाला. आतां बाबांच्या आचारसंहितेंतील एक तत्त्व वर दिलें आहे तें आजच्या मानवी जीवनास कसें लागू पडतें याचा विचार करूं.

आपुलें आपुल्यासंगें, दुजियाचें दुजिया संगें हें तें तत्त्व होय. आपलें कोणतें व दुजियाचें कोणतें? देवानें दिलें तें? देव म्हणजे काय एखादी सामर्थ्यशाली व्यक्ति आहे कीं जी आपणास देते व आपणांपासून घेते? देव कांहीं देत नाहीं नि घेतही नाहीं. आपण देतों नि घेतों. आपण मिळवतो नि भोगतो. जें आपण मिळवलें तें आपलें व जें दुसऱ्यानें मिळवलें तें दुसऱ्याचें. आपण कांहीं कमावलें होतें म्हणून हा मनुष्यजन्म मिळाला व ज्यांनीं तसं कांहीं कमावलं नाहीं ते पशु-पक्षांच्या जन्माला गेले. पूर्व जन्मीच्या पेढींत जी आपली गंगाजळी होती तिच्यावर या जन्मीं जीवन जगतों आहोंत. गेल्या जन्मींची शिल्लक ती या जन्मींचें भांडवल. पूर्वजन्मींची फळें म्हणजे या जन्मींचें जीवन. आपण कमावलेली पूर्वजन्मींची फळें काय आपण टाकून द्यायची व दुसऱ्याच्या फळाचें अपहरण करायचें? मानवी कायदा असल्या गोष्टींना नीति समजेल कीं गुन्हा समजेल? समजा आपली फळें आपण टाकून दिली पण जेथें ती पडतील तेथें त्यांतील बिजांतून वृक्ष होऊन त्यांतून आणखी

फळें निर्माण होतीलच कीं नाहीं ? त्या सर्व फळांचें धनी आपणच नव्हे का ! बरें दुसऱ्याचें अपहरण केलें तर त्या अपहरणाचे फल आपल्यालाच मिळतें हेंही ध्यानीं घ्यावें ! पूर्व जन्मींच्या कर्मफलावर या जन्मींचा संसार आपणांस चालवायचा आहे. मग तो गरिबीचा असो श्रीमंतीचा असो, नाहींतर आणखी कसला असो. पुनर्जन्म वा कर्मवाद कोणाला मान्य असो वा नसो; पण हें ब्रह्मां : कांहीं तुमची आमची मतें घेऊन चालत नाहीं. कर्म नियम पक्के आहेत. त्यांचें उल्लंघन कोणीही करूं शकत नाहीं. श्रीरामालाही म्हणावें लागलें—पराधीन हा जीव मानवाचा. कर्मांच्या आधिन आहोत आपण. चांगलें केलें चांगलें फळ मिळेल, वाईट केलें वाईट फळ भोगाल भोगून वाईट फळें संपवावीत व चांगली फळें मिळण्यासाठीं चांगली कर्में करावीत. परंतु दुसऱ्याचें घेण्याचा कधींही प्रयत्न करूं नये. नोकरानें धन्याच्या गादीवर बसण्याची हाव वा लोभ धरूं नये. हें बाबांना सांगावयाचें आहे. ईशावास्य स्पष्टच सांगते की, मा गृधः

आणखी थोडा पुढें विचार करूं. आपल्या पूर्वकर्मांची फळें या जन्मीं आपल्या वांट्यास येतात हें लक्षांत घेतल्यावर आपण जे कांहीं आहोंत व जसें कांहीं आहोंत ते सर्व आपल्या पूर्वकर्मानुसार आहे हें सहज ध्यानां येईल. भूतकाळावर आपला कांहीं ताबा नाहीं. भविष्यकाळ मात्र आपल्या हातचा आहे. आपणास पाहिजे तसा आपण घडवूं शकतों. कारण भविष्यकाल म्हणजे वर्तमान कालाची फळें. असें आहे तर मग आपण आपल्या परिस्थितीबद्दल वा कमतरतेबद्दल दुःख करणें, कुरकुरणें वा निराश वा हताश होणें योग्य ठरेल काय ? प्राप्त परिस्थिती ही आपणच निर्माण केलेली आहे हें समजल्यावर अमुक पाहिजे होते नि तमुक नको होतें अशी धुसफुस जीवनांत करणें योग्य कीं आपण जर परिस्थिती निर्माण करूं शकतों तर मग तींत बदलही घडवून आणूं शकतो, तशी शक्ति आपणा ठिकाणीं आहे असा आत्मविश्वास बाळगून भविष्य काळ उज्ज्वल करण्यासाठीं कंबर कसणें चांगलें ?

दुसऱ्याचें वैभव, त्याची कीर्ति, त्याची श्रीमंती पाहून या गोष्टी आपल्यापाशी नाहींत म्हणून हळहळत बसण्यापेक्षां, दुःखी होण्यापेक्षां आहे तें राखून त्यांतून अधिक उज्ज्वल निर्माण करण्याचा आपण सतत प्रयत्न केला पाहिजे. जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन आपण बदलला पाहिजे. आपुलें आपुल्यासंगे ही जगाकडे पहाण्याची दृष्टी पाहिजे. ती निरोगी आहे व तींत वाढ आहे दुसऱ्याचें तें आपुल्यासंगे ह्या दृष्टीनें जीवनाकडे पहाणें हें दूषित आहे. कारण कर्मनियमाप्रमाणें तें अयोग्य व आपल्याला अज्ञानाच्या, दुर्दैवाच्या व हालअपेष्टांच्या गर्तेत अधिकाधिक नेणारें आहे. आपुलें आपुल्यासंगे हें तत्त्व जीवन सुखी करणारें आहे; कारण त्यांत समाधान आहे, शांति आहे. शांति तेथें देवाची वसती. तेथें बुद्धि योग्यप्रकारें काम करते म्हणून भरभराट

व उन्नति. आपुलें आपुल्यासंगे या दृष्टीनें जीवनाकडे बघण्याची ज्याला संवय आहे तो जीवनांतील आनंद तेवढा नेमका टिपून घेतो. दुःख, खेद, विषाद हें त्याला स्पर्श करूं शकत नाहींत. दुजियाचें तें आपुलें ही विकृत दृष्टी आहे. यामुळें सर्वप्रकारच्या हीन गोष्टी घडून येतात. दुसऱ्याचें वैभव पाहून आपल्या मनाला आनंदाऐवजीं वाईट वाटतें. कारण तें आपल्याकडे नाहीं म्हणून. शेपूट तुटलेल्या कोल्ह्याप्रमाणें जें आपल्याकडे नाहीं तें दुसऱ्याकडेही नसावें अशी एक विकृत भावना मानवांत गुस-रीतीनें वसत असते. एवढेंच नव्हे तर दुसऱ्याचें तें आपणास मिळावें म्हणून अभिलाषाही उत्पन्न होते. ती सफल झाली नाहीं तर त्या व्यक्तीबद्दल मत्सर वाटूं लागतो. त्यामुळें द्वेष निर्माण होतो व मग गीतेंत सांगितलेली कामक्रोधादी मालिका निर्माण होऊन संभ्रम होतो व अंती सर्व नाश होतो. आपुलें आपुल्यासंगे या दृष्टीनें जर जीवन व्यतीत केलें तर अशाप्रकारचे अनर्थ टळतील व जगांत सुख व प्रगती यांची वाढ होईल.

ताजमहाल किंवा एकादें सुंदर सृष्टिसौंदर्य पहात असतां आपण त्या कलाकृतीचें कौतुक करतों. कलाकाराला धन्यवाद देतों व दृष्टीनें मिळेल तेवढा आनंद उपभोगतो. त्यावेळीं ती कला निर्माण करणाऱ्या कलाकाराबद्दल आपल्याला मत्सर वाटत नाहीं कीं, आपलें घर ताजमहालसारखें नाहीं म्हणून खंतही वाटत नाहीं. घरीं परतल्यावर आपलें घर आपणांस पूर्वीइतकेंच प्रिय असतें. त्यांत पूर्वीप्रमाणेंच आनंद वाटतो. तें ताजमहाल नाहीं म्हणून कष्टी होत नाहीं. याच दृष्टीनें जीवनाकडे, परिस्थितीकडे, संकटें व हालअपेष्टांकडे पाहिल्यास एक प्रकारचें धैर्य आपल्या अंगीं येऊन प्राप्त परिस्थितींतून वाटचाल करण्यास अंगीं सामर्थ्य येतें. ही दृष्टी प्राप्त झाली कीं सर्वत्र आनंद, प्रेम भरलेलें आहे असा नवा अनुभव येऊन अशी दृष्टी असणाऱ्या माणसाचें सर्व जीवन पालटून सुखानें व आनंदानें भरून जातें. याच दृष्टीनें आपल्या व दुसऱ्याच्या जीवनाकडे, वैभवाकडे व संपन्नतेकडे पहावें व आपलें घर उत्तमांत उत्तम करण्याचा प्रयत्न करावा, ही गोष्ट आपल्या सूत्रांत बाबांनी सूचीत केली आहे. ऐन लढाईच्या वेळीं ही निरोगी दृष्टी गेल्यामुळें अर्जुनाला संभ्रम झाला व पुन्हां त्याला ती दृष्टी प्राप्त करून देण्यासाठीं स्वधर्मे निधनं श्रेयः हें कृष्णाला त्याच्या ध्यानीं आणून द्यावें लागलें.

आपलें तें आपुल्या संगे, या सूत्रांत आपण आपलें कर्तव्य करावें, आपल्या धर्मा-प्रमाणें चालावें असेंहि सूचीत केलें आहे. धर्म म्हणजे काय ? कांहीही समजा, पण जें कांहीं समजाल त्याप्रमाणें चाला म्हणजे झालें. इतरांचें अनुकरण म्हणून अनुकरण करूं नये असेंहि सूचीत होतें. करायचेंच तर आपल्या व त्याच्या योग्यायोग्यतेचा, सामर्थ्याचा विचार करावा, नाहींतर फजिती पदरांत पडते. श्रीमंत ज्या फॅशन्स

करतात व ज्या तऱ्हेनें वागतात तसा जर एखादा गरीब करूं लागला तर त्यांत काय त्याचे हित होईल? माणसें एकमेकांचे अनुकरण करतात, पण असें करतांना योग्यायोग्यतेचा व फायद्या–तोट्याचा विचार करीत नाहींत. यामुळें नुकसान व कित्येक वेळां नाश पदरीं येतो. फळीवर झोपण्याचें माझें सामर्थ्य आहे. त्यामुळें ती गोष्ट मी करूं शकेन. भगताला ती करणें शक्य नाहीं. त्यानें ती करण्याच्या भरीस पडूं नये व कोणी तसें त्यास सांगू नये. खालीं कोसळल्याखेरीज त्यांतून दुसरे कांहीं निष्पन्न होणार नाहीं. असें बाबा सांगतात. आणि खरच आहे तें. जें बाबा करूं शकले असते तें काय भगताला करतां आलें असतें? सूर्य अख्या जगाला प्रकाश देतो म्हणून त्याचो बरोबरी करण्याचा एकाद्या पणतीनें प्रयत्न करणें योग्य ठरेल काय? खूप प्रयत्न केला म्हणून काय बेडकी बैला-एवढी फुगूं शकेल? थोरामोठ्यांचें केलेलें असलें अनुकरण आत्मघातकी नव्हे तर काय? दुसऱ्याचें पाहून मीही तसें करूं शकतों असा नसता मोठेपणा मिरविण्यासाठीं कांहींही करणें घातुक आहे. एकाद्या धनिकानें भरगच्च आहेर केला म्हणून त्याचा एकादा गरीब नातलग जर तसेंच करील तर तो आपल्या पायावर आर्थिक धोंडा पाडून घेईल. शिवाय इतरेजन जरी वरून गोड बोलेले तरी आंतून त्याला नांवेच ठेवतील हें निराळेच. साहेब ऑफिसांत उशीरा येतो व लौकर जातो म्हणून कारकून मंडळीही तसेंच करूं लागली तर ती गोत्यांत येईल. साहेबाचें साहेबापाशीं व कारकुनांचे कारकुनापाशीं, हें ओळखलें पाहिजे. कारकुनानें साहेबासारखें करूं नये व साहेबानें कारकुनासारखें करूं नये. यांतच शिस्त आहे. हित आहे. एकादी गोष्ट एकाद्याला शोभून दिसली म्हणजे ती दुसऱ्याला शोभून दिसेलच असें नाहीं. एकाद्या गोरकाय स्त्रीला काळी चंद्रकळा शोभून दिसते म्हणून जर एकादी काळीकुट्ट बाई काळी चंद्रकळा नेसली तर तें दृश्य कसें दिसेल? चंद्रकलेऐवजीं अमवास्येच्या अवकळेचा मात्र भास होईल. व्यक्तिव्यक्तींत योग्यायोग्यता, आचारविचार, ताकद वगैरे दृष्टीनें भेद असतात. त्यामुळें एकाचें दुसऱ्याला चालेलच असें नाहीं. बाबांची (वडिलांची) पँट बाळयानें घालण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे. अनुकरण करतांना डोळसपणा पाहिजे, अंध अनुकरण निकामी आहे. अनुकरण करायचेच झालें तर तें चांगल्याचेंच असावें व त्यासाठीं लागणारें सामर्थ्य अगोदर आपल्या अंगीं आणावें.

कर्तव्याच्या दृष्टीकोनांतून सूत्राचा विचार करूं. जीवनात नानातऱ्हेच्या जबाबदाऱ्या आपणावर असल्यामुळें आयुष्यभर नाना प्रकारची कर्तव्यें आपणांस इच्छा असो वा नसो करणें भाग असते. तीं टाळतां येत नाहींत व टाळली तरी सुटत नाहींत. व्यक्ति म्हणून आपली स्वतःबद्दल कांहीं कर्तव्यें असतात. वयपरत्वें ही कर्तव्यें बदलत असतात. बालवयांत जीं कर्तव्यें असतील ती आपण तरुण वयांत करीत नाहीं व तरुण वयांतील

बालवयांत करीत नाहीं. उलटापालट झाली तर शारीरिक व मानसिक वाढ व्हावी तशी होणार नाहीं. विद्यार्थीदशेत विद्यार्जन करणें, भावी जीवनास योग्य अशा संवया लावून घेणें, शरीर मजबूत करणें, मानसिक आरोग्य कमावणें ही विद्यार्थ्यांची कर्तव्यें आहेत. भावी आयुष्याची सर्वप्रकारें तयारी करणें व येणाऱ्या सर्वप्रकारच्या संघर्षांना यशस्वी तोंड देतां येईल असा जोम कमावणें हें विद्यार्थ्यांचें काम आहे; कारण या गोष्टी करण्याचें हें वय आहे व या वयांत वेळही भरपूर असतो. वय व वेळ एकदां गेली कीं पुन्हां परत येत नाहींत व ऐन तारुण्यांत या सर्व गोष्टी शिकूं म्हटल्यानें शिकतां येतीलच याची खात्री नसते व पुरेसा वेळही मिळणें मुष्कील होते. यामुळें विद्यार्थ्यांनीं आपली कर्तव्यें सोडून तरुणाप्रमाणें राजकारण वा समाजकारण यांत प्रत्यक्ष भाग घेणें म्हणजे स्वतःची प्रगति स्वतः थांबविणें होय. शिक्षण घेण्याच्या दृष्टीनें अगर ज्ञान संपादण्यासाठीं जरूर तो भाग घ्यावा, पण ही मर्यादा ओलांडणें म्हणजे दुजियाचे आपुल्यासंगे होय. व तें हानिकारक आहे. भविष्यकालीन जीवनास जरूर त्या गोष्टी मिळवल्यानंतर तरुणांनीं गृहस्थाश्रमांत प्रवेश करावयाचा असतो. उत्साहानें प्रवेश करणारे पुष्कळ, पण उत्साह कायम टिकवणारे थोडे. संसाराच्या दोनतीन वर्षांत बहुतेकांचे तारूं निराशेकडे झुकूं लागते. विद्यार्थीदशेंत दुजियाचें अपुल्या संगे असें झाले कीं हा परिणाम होतो. अर्ध्याकच्च्या तयारीनिशी संसारांत पडलेल्या तरुणांची स्थिति कच्च्या मडक्याप्रमाणें होते हलक्या फुलक्या संकटानेंहि त्यांना तडे जातात. संसारांत आपल्याला कौटुंबिक जबाबदाऱ्या व कर्तव्यें पार पाडावयाची आहेत, त्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये कोणती व ती कशी पार पाडावयाची या सर्वांची जाणीव संसारात पडण्यापूर्वी असली पाहिजे. नाहींतर अक्षरशः संसारांत पडण्याची पाळी येते. जीवनांतील अधिकाधिक दुःखें व हाल-अपेष्टा जर कोणत्या काळांत वांट्यास येत असतील तर तो हा गृहस्थाश्रम होय. या काळांत अगदीं पट्टीचे वीरसुद्धां हां हां म्हणतां म्हणतां पिछाडीस जातात. संसार दुरून सुखाचा व सुंदर वाटतो. पण त्यागाच्या असिधारावर संसाराचें सुख आहे याची जाणीव प्रथमतः नसते. सुखाचा संसार हा त्यागावर आधारलेला आहे. कुटुंब प्रमुखानें आपल्या कुटुंबियांच्या सुखासाठीं स्वतःच्या सुखसोयींना त्याग करणें हें त्याचें कर्तव्य आहे, तें त्यानें केलें तरच सुखाचा संसार वांट्यास येईल. जसजशी संसारांत जास्त वर्षें जातील तसतसा स्वार्थ कमी कमी होत गेला पाहिजे व त्यागाचें प्रमाण वाढत राहिले पाहिजे. कुटुंबामध्यें अनेक नात्याशी आपला संबंध येतो. पतिपत्नी, भाऊबहीण, आईवडील, मुलें मुली व इतर नात्याचे संबंध निर्माण झालेले असतात. ते सर्व सांभाळण्यासाठीं सलोखा व सहकार्य राखण्यासाठीं त्यागाची जरुरी आहे. त्याग म्हणजे केवळ पैशानें झिजणें

नव्हे तर आपल्या अनेक मनोविकारांचाही त्याग त्यांत समाविष्ट आहे. आपले काम, क्रोध, लोभादी विकार व मानापमान वेळ प्रसंगी गुंडाळून ठेवणें भाग असते. कुटुंबां तील प्रत्येक व्यक्तीनें एकमेकांच्या सुखासाठीं, हितासाठीं त्याग केला पाहिजे तरच संसारांतील संकटांच्या खाईंतसुद्धां सुखाचे शीतल झरे वाहत राहतील. आपुलें आपुल्यासंगें, आपलें कर्तव्य आपण केलें पाहिजे. दुसरे तें करण्यास येणार नाहींत. हें ओळखून कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें एकमेकांच्या कल्याणासाठीं झटलें पाहिजे. ज्यानें त्यानें आपला वांटा उचलला पाहिजे. शेजारचे करीत नाहीं म्हणून आपण टाळूं नये. आपलें कुटुंबीय कसेही असले व इतरांचे कुटुंबीय कितीही चांगले असले तरी त्यांकडे लक्ष न देतां आपण आपले घर जास्तीत जास्त चांगले करण्याचा कसोशीनें प्रयत्न करावा. यांत सुख आहे. कल्याण आहे. कित्येकांना घरचें सोडून बाहेरच्या मागें लागण्याची संवय असते. ती दुसऱ्याचें आपुल्या संगेत जमा होतें म्हणून हानीकारक आहे. वाढत्या संसारांतूनच हळूं हळूं म्हातारपण डोकावूं लागते. म्हातारपणीं मुलांबाळांच्या संसारांत अकारण लक्ष घालण्यापेक्षां आपली दृष्टी संसारा कडून वळवून ती पैलतीरी लावणें कल्याणाचें आहे. जरूर असली व मान्य होत असेल तर आपल्या अनुभवाच्या ज्ञानाचा फायदा द्यावा. नाहींपेक्षां अध्यात्मिक दृष्टी म्हणजेच आपुले आपुल्यासंगें. म्हातारपणीं कोणी कांहीं ऐकलें नाहीं तर मनस्ताप करून न घेतां अशा वेळीं बाबा जें म्हणत असत कीं, बरें झाले. काय की आपुलें हरविलें ? असें म्हणून स्वस्थ बसावें. नाहीं तर गैरसमज व वितुष्ट निर्माण होतात. म्हाताऱ्या आईवडिलांनीं मुलांबाळांच्या व्यवहारांत अकारण ढवळाढवळ करणें हें विभक्तपणाला दिलेलें आमंत्रण आहे.

धार्मिक दृष्टीनें बाबांच्या सांगण्याकडे पाहिलें तर त्यांत बाबानीं स्वतःसंबंधीं कांहीं सांगितलें असावें असें वाटतें व तें सांगता सांगता बहुमोलाचा उपदेशही त्यांनीं केला आहे. बाबा हिंदु कीं यवन ही शंका त्यावेळीं भक्तांच्या मनांत येईल व कदाचित अजूनही येत असेल. अशा शंकित मनाला बाबानीं या उक्तींत उत्तर देऊन ठेवलें आहे. बाबांचा जन्म व बाबांचा धर्म या संबंधी अजूनही कोणास कांहीं खात्रीलायक माहीत नाहीं. कोणी कांहींही अंदाज करोत, पण बाबानीं त्यासंबंधी कोणास दाद लागूं दिली नाहीं. याची जी कांहीं कारणें आहेत त्यांतील एक कारण या उक्तींत व्यक्त झालेले आहे. आपुलें आपुल्या संगें. माझें माझ्याबरोबर. इतरांना त्यांत कशाला चौकशा पाहिजेत ? माझ्या आई–वडिलांची तुम्ही चौकशी करतां. पण तुम्ही येथें येतां ते कोणाला भेटायला ? मला ना ? मग मी येथें तुमच्यासमोर उभा आहे. झालं तर तुमचं काम. काय करायचं आहे माझ्या आईवडिलांशी तुम्हाला ? माझा धर्म कोणतां असें विचारतां. पण तो कळल्याने तुम्हाला कोणता फायदा होणार ? माझ्या-

कडे तुम्ही येतां, कां ? माझा धर्म स्वीकारण्यासाठीं कीं माझ्यापासून ऐहिक वा परमार्थिक फायदा करून घेण्यासाठीं ? फायदा कल्याण करून घ्यायचें असेल तर तें करून घ्या, तुमच्या कल्याणांत माझ्या धर्मांचा संबंध काय ? पण तुम्हां मानवांना एक वाईट खोड आहे. आपल्या धर्मांची काडीमात्रही माहिति नसतां दुसऱ्या धर्मांच्या उठाठेवी करावयाच्या. तो आपला नाहीं हें कळलें कीं मग त्याची निंदा करायची, त्याला खालीं पाडायचा. अशी हानिकारक वृत्ति मला नको आहे तुमच्या ठिकाणीं. माझा धर्म माझ्यापाशीं, तुमचा धर्म तुमच्यापाशीं. तो पाळा म्हणजे झालें. तुमचा स्वयंपाक तुम्ही जेवा. शेजारी काय जेवतो हें कळल्यानें काय तुमचें पोट भरणार आहे ? मी जें सांगतो तें तुमच्याच धर्मांतील सांगतो. तें केल्यानें तुमच्या धर्माला बाध येणार नाहीं. त्याची शंका बाळगूं नका. तुमच्या देवतांची तुम्ही खुशाल पूजा करा. रीतिरिवाजाप्रमाणें काय पूजाअर्चा करायची ती करा. तुमच्या आचाराविचारांप्रमाणें तुम्ही चाला. तुमच्या धर्मांची मी कधीं चौकशी करतो कां ? तुम्ही कोणता जप करतां, नामस्मरण कसलें करतां, कोणाला गुरु केले आहे वा कोणत्या दैवताची भक्ति करता हें मी कधीं तरी विचारतो ? माझें काम तुम्हांला जीवनाच्या मार्गांवर रस्ता दाखविण्याचें आहे. वाटाड्या मी तुमचा. मला काय करायचें तुमच्या धर्मांविषयीं ? मला माझी दक्षिणा मिळाली म्हणजे झालें. तुम्ही रस्त्यानें सुखरूप ठिकाणीं पोहोंचलांत कीं झालें माझें समाधान. तीच माझी दक्षिणा. ती द्या म्हणजे झालें. सगळीं दैवतें व सगळे धर्म सारखेच. मी वाटाड्या ना ? मग मला हे सर्व मार्ग ठाऊक कां नाहींत ? म्हणूनच सांगतों धर्मांच्या दृष्टीनें आपुलें तें आपुलें. दुसऱ्याच्या जातीधर्मांची चौकशी कशाला ? निष्कारण गैरसमज व हेवेदावे मात्र होतात व कार्यांचा नाश होतो. पूर्वकर्मानुसार ज्या धर्मांत जन्माला आला तो तुमचा धर्म. त्यांतच तुमची प्रगति आहे. तुम्हांला गोड आवडते ना ? मग गोड खा. दुसऱ्याला तिखट आवडते तो तिखट खाईल. त्याचे पाहून तुम्ही तिखट खाल तर जीभ पोळेल. तुम्हांला राम आवडतो तर रामाची भक्ति करा. कृष्ण आवडतो तर कृष्णाची भक्ति करा. तुमच्या गुरूची भक्ति तुम्ही करा. इतरांना त्यांच्या गुरूची भक्ति करू द्या ढवळाढवळ नको कीं चेष्टा कुचेष्टा नको. सगळे देवधर्म, गुरु एकच आहेत. नामरुपाच्या भेदाला, मायेच्या डावाला फसून आपापसांत भांडू नका नि तंडू नका. त्यांतच तुमचें कल्याण आहे. त्या पंडित मुल्यांना मी काय लीला दाखवली ती माहीत आहे ना तुम्हांला ? झालं तर मग. तेंच तें. आपुलें आपुल्यासंगें.

अशी दृष्टी येण्यास कांहीं अध्यात्मिक पथ्यें पाळावी लागतात. ज्यावेळीं आपलें मन निरुत्साही व निराश होईल त्यावेळीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें कर्मवादाची आठवण करावी. कर्मफलांचा भोग भोगणें हें आपलें कर्तव्य आहे हें ओळखून जें कांहीं काम

आपल्या वांट्यास आलें असेल तें निःस्वार्थीपणें करण्याची आपली वृत्ति पाहिजे. कर्मफलाच्या अभिलाषामुळें आपण जीवनांत गुंतलेले असतों. यामुळें जी कांहीं कर्मे आपण करूं त्यांत कांहीं आशा अकांक्षा न ठेवतां केवळ कर्मासाठीं कर्म आचरण करीत राहिलें पाहिजे म्हणजेच अनासक्ती योग किंवा गीतेंतील कर्मण्येव्याधिकारस्ते याचें आपण पालन केलें पाहिजे. आपण जें कांहीं करतों तें कांहीं केवळ आपल्या एकट्यामुळें झालेलें नसतें तर त्यांत इतरांचाही वाटा असतो. यास्तव मी कर्ता हा अभिमान सोडून कर्ता करविता परमेश्वर आहे अशी भावना आपण धारण केली पाहिजे. या सर्व गोष्टी अंगीं बाणण्यास कोणते योग आचरावे हें श्रीकृष्णानें गीतेंत सांगून ठेवले आहेत. त्यामध्यें सर्व योगांचा समन्वय करणारा भक्तियोग व नामयोग सर्वसाधारण माणसाला सोईचा व उपयुक्त आहे. नामस्मरणानें निःस्वार्थी व अनासक्ती वृत्ति अंगी बाणण्यास पुष्कळ मदत होते. हरएक कामांत आपण कृष्णार्पण वृत्ति धारण केली तर कर्म करूनही त्याच्या फलाचे आपण मालक न झाल्यामुळें पुनःजननाचें आपणांस कारण होत नाहीं. म्हणजेच मुक्ति म्हणतात ती आपणांस मिळते. आणि हें अगदीं साहजिकच आहे. कारण फळें भोगण्यासाठीं तर जीवन आहे. पण फळेच नसली तर मग जीवन कसलें व जन्म कशासाठीं ? बँकेत खातेंच नसलें तर मग तेथें कां कोणी उगाच जा ये करील ? बाबांनीं जे सांगितलें आहे आपुलें अपुल्यासंगे दुजियाचें दुजिया संगे याच्या आधीं एक ओळ व पुढें एक ओळ आहे. बाबांनीं फक्त मधली ओळ सांगितली. कारण आजचा मानव हा आपल्या प्रगतीच्या मधल्या टप्प्यावर आहे. पूर्वी आदिमानव होता. ( Wild ) त्यानंतर मानव ( Human ) झाला व पुढें अतिमानव ( Super human ) होणार आहे. आदिमानव म्हणत असे अपुलें अपुल्यासंगे, दुंजियाचेही अपुल्यासंगे. आज मानव म्हणतो अपुले अपुल्यासंगे. दुजियासंगे आदिमानव म्हणेल अपुलें तें दुजियासंगे व दुजियाचेही दुजियासंगें. माझें तें माझें व दुसऱ्याचेही माझें ही दृष्टी रानटी मानवाची. माझं तें माझें व दुसऱ्याचें तें दुसऱ्याचें. तें मला कशाला पाहिजे. ही दृष्टी मानवाची व माझं तें तुझं व तुझें ते तुझंच. आहे तें सर्व तुझंच. माझं कांहीं नाहीं आणि तुझं म्हणजे देवा, तुझं परमेश्वराचें ही दृष्टी अतिमानवाची. आज ना उद्यां आजचा मानव अतिमानवाची पायरी चढणार आहे. त्याची तयारी म्हणून या टप्प्यावरील श्रीदवाक्य बाबांनीं सांगितलें. मानव आणि अतिमानव यामध्यें आणखी एक लहानशी पायरी आहे. ती अगोदर चढली पाहिजे. ती म्हणजे सहजीवनाची, सहकार्याची, एकमेकांना मदत करण्याची. एकाद्या देशांत दुष्काळ पडला तर इतर देश धान्याची व अन्य मदत करून त्या देशाला दुष्काळांतून वांचविण्याचा प्रयत्न करतात. एकमेकांच्या मदतीचा जगभर फिरणारा ओघ दिसतो आहे तसा तो शंभर वर्षांपूर्वी राष्ट्राराष्ट्रांत दिसत असता काय ! कारणें

काहींही असोत, पण हे निश्चित कीं, आज संकटकाळीं एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला सहाय्य करण्यास तयार होते, सर्व राष्ट्रांनीं सहकार्यानें, सलोख्यानें भाऊ भाऊ म्हणून रहावें. भांडणतंटे शांततेनें व समजुतीनें मिटवावेत. अशा विचारानें मोठमोठीं राष्ट्रें एकमेकांच्या संगतीनें राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. अखिल मानव जात या विचारानें आज भारून गेली आहे. तदनुसार थोडीफार कृतीही होत आहे. प्रांताभिमान, जात्याभिमान हें भूतकाळीं मान्यता पावलेले असले तरी आज ते संकुचित वृत्तीचे द्योतक समजलें जातें. कालांतरानें राष्ट्राभिमानही संकुचित वृत्तींत जमा होऊन अखिल मानवजात ही एक, अशी दृष्टी निर्माण होईल, अर्थात् हें घडून येण्यास शेंकडों वर्षे लागतील. बंधुभावाची ही पायरी चढून गेल्यावर अतिमानवाच्या शिखराची चढण लागेल. दिवसेंदिवस मानवाची प्रगति या दिशेनें होत आहे हें निश्चित. ही गोष्ट ४००–५०० वर्षांपूर्वींच्या काळाकडे नजर टाकल्यास कोणासही मान्य होईल. अधुनमधून कांहीं घटना अशा घडतात कीं, मानवाची परागति होत आहे कीं काय अशी शंका येते. पण यांत निराश होण्यासारखे कांहीं नाहीं; कारण प्रगतीसाठीं थोडीफार परागति होत असते. तें अपरिहार्य आहे. जितक्या जोरानें चेंडू आपटी खातो त्याच्या दुप्पट जोरानें तो वर उसळी घेतो. पण हें सर्व होत असलें, बंधुभावाची व सहकार्याची पायरी मानव चढत असला तरी तो अपुलें आपुल्या संगें या पायरीवर आज अधिष्ठित आहे व त्यास अनुसरून व्यक्तांनेच नव्हे तर राष्ट्रानेही आपलें जीवन कंठिले पाहिजे. आपलं आपल्याला, दुसऱ्याचें दुसऱ्याला. दुसऱ्याचें आपल्यास नको तसेंच दुसऱ्यानें आपलें घेतलेले चालणार नाहीं. म्हणूनच आपला भारत दुसऱ्याच्या एक इंचही जागेची अपेक्षा करीत नाहीं व आपली एक इंचही जागा दुसऱ्यास देणार नाहीं. या तत्त्वावर सर्व जगाशीं व्यवहार करण्यास व सर्व राष्ट्रांशीं बंधुभावानें राहण्यास सर्वांआधीं भारत तयार झाला आहे. इतर राष्ट्रांना हा दृष्टीकोन मान्य असून तीही त्याच मताची होऊं लागली आहेत. अति मानवतेच्या चढणीवर भारत अग्रेसर आहे. कारण त्याला वेदकालापासून ऋषिमुनींचें तसेंच साधुसंतांचें मार्गदर्शन लाभलें आहे. त्यांचे आशीर्वाद भारताला आहेत.






## अनुभव १ ला

**श्री. द. व. पोतनीस** ( ८८, जुना बाजार खडकी, पुणें ) हे लिहितात कीं—

### मला नोकरी कशी मिळाली

माझे शिक्षणक्षेत्रांतील मित्र श्रीयुत कृष्णाजी भास्कर देशमुख यांचे सल्ल्यानुसार दिनांक १४ डिसेंबर १९४० रोजी मुंबई ऑफिसमध्यें ( डिफेन्स अकौन्टस ) मी नोकरीसाठीं अर्ज लिहिला त्यावेळीं मी पुरंधरे कॉलनी पुणे येथील डॉ. वामन गणेश अत्रे यांचे दवाखान्यांत दरमहा रुपये ६—०० पगारावर नोकरीला होतो. मी लिहिलेला अर्ज घेऊन बुधवार पेठेतील दगडू हलवाई श्री दत्तमंदिरांत दत्त पादुकांचेवर माझा अर्ज ठेवला आणि श्रीसद्गुरु साईबाबांची प्रार्थना करून मंदिरांतून बाहेर आलो. मला मुंबई ऑफिसला जाण्याचा रस्ता माहीत नव्हता म्हणून श्रीदत्तमंदिराजवळील बाहुलीचे हौदाजवळ एका टांग्यात एक वृद्ध गृहस्थ बसले होते त्यांनाच मुंबई ऑफिसचा पत्ता विचारला. त्यांनीं मला टांग्यात बसावयास सांगितले आणि मुंबई ऑफिसमधेच जाणार आहे तेव्हां टांग्यामधूनच आपण जाऊं; परंतु माझेजवळ टांग्याचे भाडे द्यावयास पैसे नाहींत, मला फक्त कोणत्या रस्त्यानें कसें जावयाचे ते सांगा मी पायीं जातो असें मी त्यांना सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, हा टांगाघोडा माझा आहे आमचा चांदभाई चहा पिण्यास गेला तो आतां येईल, मग जाऊं. मी टांग्यांत बसलो. चांदभाई आले आणि आमच्या टांग्याचा घोडा भरधांव धांवत सुटला. मुंबई ऑफिसच्या दारांत पंधरावीस मिनिटांत पोहोंचला. माझा अर्ज त्या गृहस्थानींच ऑफिसमध्यें रेकॉर्ड सेक्शनमध्यें दिला व मला परत जाण्यास सांगितलें.

दिनांक ४ जानुआरी १९४१ रोजी ऑफिसमधून मला मुलाखतीसाठीं बोलाविण्यांत आलें. मी दिनांक ११ जानुआरी ४१ रोजीं सकाळीं १०॥ वाजतां ठरलेल्या वेळीं जावयास निघालों. श्रीदत्तमंदिरांत दत्तपादुकांचें दर्शन घेतलें, श्रीसद्गुरु साईबाबांना चरणी मस्तक ठेवून प्रार्थना केली आणि माझा मार्ग चालू लागलों. फरसखाना हौदासमोर पुन्हां तेच गृहस्थ टांग्यांत बसलेले दिसले म्हणून मी त्यांना नमस्कार केला व मला मुलाखतीसाठीं बोलावल्याबद्दल सांगितलें. त्यांनी मला मुलाखतीमध्यें काय विचारणार आहेत तें सांगितले व हस्ताक्षर पहाण्यासाठी लिहून घेतील तेव्हां इंग्रजी ९ नंबरचें निब घेण्यास सांगितलें, परंतु तें निब घेण्यास एक पैसासुद्धां मजजवळ नव्हता. तेव्हां त्या गृहस्थानींच फरसखाना हौदासमोर पी. डी. भदर्से यांचे स्टेशनरी दुकानांतून एक निब आणि एक होल्डर घेऊन दिले. त्यांचे बरोबरच टांग्यांतून मी ऑफिसमध्यें गेलो. माझी मुलाखत ऑफीसर पेरा जे. एस. यांनीं घेतली. हस्ताक्षरासाठीं एका पुस्तकांतील एक प्यारा लिहून घेतला. माझी मुलाखत संपली व मी घरीं परत फिरलो.

दिनांक ४ फेब्रुवारी १९४१ रोजीं संध्याकाळीं ६ वाजतां डॉक्टर अत्रे यांचे दवाखान्यांत काम करीत होतो त्यावेळीं 'आर' सेक्शन सुपरिन्टेंडेन्ट श्रीयुत आर. एस. आपकर ऑफिसमधील पत्र समक्ष घेऊन आले. त्यांनी मला सांगितलें कीं, हें पत्र पोस्टानें पाठविलें असतें तर वेळेवर मिळणार नाहीं. तारीख ५ फेब्रुवारी १९४१ रोजीं ऑफीसमध्यें सकाळीं बरोबर १० वाजता तुला कामावर हजर व्हावयास पाहिजे म्हणून समक्ष आल्याबद्दलचें सांगितलें. त्यांना माझा दवाखान्याचा पत्ता कोणी दिला व ते कसे आले वगैरे मी चौकशी केली, परंतु त्यांनीं मला कांहीं सांगितलें नाहीं.

मी दिनांक ५ फेब्रुआरी १९४१ रोजीं ठरलेल्या वेळीं ऑफीसमध्यें कामावर रुजू झालो, परंतु त्या दिवसापासून टांग्यातील गृहस्थ किंवा चांदभाई टांगेवाला पुन्हा कधींच दिसला नाहीं.

श्री सद्गुरु साईबाबाच त्या गृहस्थाचे रुपांत येऊन मला कायमची नोकरी दिली असें सांगतांना वाचकाप्रमाणेंच मला आनंद वाटतो. श्री सद्गुरु साईवचनच आहे कीं—

" जरी हें शरीर गेलों मी टाकून तरी मी धांवेन भक्तांसाठी ॥ "

× × ×

## अनुभव २ रा

**माझी लाज कशी राखली**

१५ मे १९४१ रोजीं मी शिकत होतो त्या शाळेंतील ( पुना इंग्लिश स्कूल ) आजी व माजी विद्यार्थ्यांची सिंहगड येथें सहल निघाली. मी सहलीसाठीं त्यांचेबरोबर निघालों. आमची निघण्याची वेळ रात्री १०॥ नंतर चंद्रोदय झाल्याबरोबर ठरली. सर्वजण श्रीयुत प्रभाकर दामोदर देशपांडे यांचे घरीं जमले आणि ठरलेल्या वेळीं सहलीस सुरुवात झाली. गप्पागोष्टींत आमचा मार्ग केव्हां संपला तें समजलें नाहीं. आम्हीं सर्वजण डोणजे गावांत एका मारुतीचे देऊळांत थोडा वेळ विश्रांती घेण्यासाठीं थांबलों. सर्व विद्यार्थ्यांचे इच्छेनुरूप तेथेंच चहा तयार केला व सकाळीं ६ वाजतां सिंहगड चढण्यास सांगितल्याप्रमाणें आमचा मॉनिटर पुढें झाला व आम्ही सिंहगड चढण्यास सुरुवात केली. गडावर गेल्याबरोबर प्रथम सर्वांनीं आपापले डबे सोडले व फराळ केले. देवटाकींतील थंड पाणी पिऊन गड पहाण्यास सुरुवात केली. दुपारीं साडे बारा वाजतां पुन्हा देवटाक्याजवळ आलो. थोडा वेळ विश्रांती घेऊन सर्व विद्यार्थ्यांनी गप्पागोष्टींत जेवण उरकले. डबे संपून गेले. संध्याकाळीं चार वाजतां चहा केला व बरोबर घेतलेले पाव चहाबरोबर संपविले. अंधार पडण्याचे आंत खालीं उतरण्यास सुरवात केली, परंतु अर्धा गड उतरून आलो तोंच अंधार पडू लागला. उतरण्याच्या गडबडीत कांहीं ठेचाळून पडले. आम्ही पुन्हा डोणज्याचें मारुती मंदिरांत थांबलो. सर्वांना भूक लागली, परंतु डबे संपलेले. पैसे सर्व संपलेले. म्हणून सर्व गप्प बसले. परंतु माझा एक मित्र श्री. कमळाकर जोशी म्हणाला की, पोतनीस, तूं साईबाबांचे कडून कांहींतरी दे ना आम्हांला. पाहूं तुझी यावेळी भक्ती कशी आहे ती. मी यावेळी फारच रागांत आणि कठोर शब्द माझे मित्राला वापरले आणि एक सतरंजी घेऊन जवळच्या एका आंब्याचे झाडाखाली बसलों. त्या झाडाखाली एक काडेपेटी पडली होती ती घेतली आणि त्यांत एखादी काडी असेल तर मारुतीमंदिरांत दिवा लावावा म्हणून उघडून पाहतो तोंच मला त्या कांडेपेटीत दहा रुपयाची एक नोट दिसली. प्रथम माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना, परंतु मी ती नोट उघडून पाहिली. आणि श्रीसद्गुरु साईंचा प्रसाद श्रीयुत जोशी यांना दाखविला. या दहा रुपयामुळें माझ्या सर्व मित्रांना भरपूर फराळाचे देण्यांत आले. माझी लाज नव्हे तर श्रीसद्गुरु साईंच्या सत्यत्वाची जाणीव अद्यापही सर्वांच्या आठवणींत आहे. श्रीसद्गुरु साईवचन आहे कीं—

माझा जो जाहला काया वाचा मनीं
तयाचा मी ऋणी सर्वकाळ

साई म्हणे तोचि झाला धन्य
झाला जो अनन्य माझे पायी.

× × ×

## अनुभव ३ रा

### माझी अहमदनगर येथें बदली

सन १९४७ मध्यें माझी बदली अहमदनगर येथें झाली होती. माझे स्वतःचे मालकीचे असे एकही भांडे मजजवळ नव्हते; कारण माझे वडील बन्धूचे संसाराची सर्व भांडी मी माझे लग्न झाल्यापासून वापरीत होतो. माझे वडील बन्धूना दोन मुलगे व दोन मुली; पैकी मोठ्या मुलीचे लग्न झाले होते व मोठा मुलगा माझे तीन नंबरचे भावाकडे राहत होता. एक मुलगी व एक मुलगा माझेकडे होती. माझी बदली झाल्यामुळें या दोन मुलांना मी माझे तीन नंबरचे भावाकडे कांहीं दिवस ठेवण्याबद्दल सांगितले. मजजवळ कांहींच भांडी नव्हतो म्हणून जरुरीपुरती भांडी बरोबर घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे दोन पोत्यांत भांडी भरलीं, परंतु अहमदनगरला जाण्याचे दिवशी ऐनवेळी माझ्या भावाच्या मुलीनें मला तिचे वडिलांची भांडी नेण्यास मनायी केली. या तिच्या कृतीमुळे मला फार राग आला. तिचेवर चिडलो परंतु उपयोग काय. निष्कारण निघण्याचेवेळी त्रास नको म्हणून मी श्रीसद्‌गुरु साईबाबांची प्रतिमा व माझे मोठ्या मुलीचे वाढदिवसामुळे मिळालेली पेला चमचा आणि कपडे घेऊन निघालो. संध्याकाळीं सात वाजतां अहमदनगर येथें माझे मित्र श्रीयुत नरहरी कुलकर्णी आगडगांवकर यांचे वाड्यांत राहात होते त्यांचेकडे उतरलो. माझे मित्राचे वडील फारच प्रेमळ. त्यांना आम्ही आप्पा म्हणतो. त्यांनी आमची राहण्याची सोय केली व जागा मिळेपर्यंत एक खोली रिकामी करून दिली. त्यांनी त्यांचे ओळखीचे रासने यांचे भांड्याचे दुकानांतून लागणारी जरुरीपुरती भांडी घेऊन दिली आणि आमचा नवा संसार सुरू झाला. माझी अडचण तर दूर झाली. श्रीसद्‌गुरु साईबाबांनी अहमदनगर येथें एक वर्ष आम्हा सर्वांना आनंदांत ठेवले.

त्यांचे वचन आहे कीं,

जाणा येथें आहे सहाय्य सर्वांस
मागें जें जें त्यांस तें तें लाभे

× × ×

## अनुभव ४ था

**श्रावणी सोमवार**

सन १९५८ मध्यें श्रावणांतल्या पहिल्या सोमवारी माझी मुलगी मेघा रात्रीं १२ वाजतां रडत उठली. तिला जिकडे तिकडे साप दिसूं लागले. तिचे वय तेव्हां ४ वर्षाचें होते आम्हा सर्वांना वाटले कीं तिला कोणीतरी पावसाळ्यामध्यें जमिनींतून निघणारी गांडुळें दाखविली असतील म्हणून भीत असेल. तिची पुष्कळ समजूत करून पाहिले. परंतु ती साप साप करून मोठमोठ्यानें रडूं लागली. आमचे शेजारी श्रीयुत दंडे फायरमन राहात होते त्यांचें घरीं नेला तरी ती झोंपेना किंवा रडण्याचें थांबेना. शेवटीं पहाटे पांच वाजतां तिला झोंप लागली.

हाच प्रकार पुन्हा दुसऱ्या सोमवारी रात्री बारा वाजतां झाला. तिला बिछान्यावर साप, अंगावर साप, आमचे सर्वांचे अंगावर साप दिसूं लागले. ती मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागली यावेळीं मात्र आम्ही सर्वच घाबरलो. मी आणि माझ्या सौभाग्यवतीनें श्री सद्गुरु सांई प्रतिमेजवळ तुपाचा दिवा लावला. उद जाळला व प्रार्थना केली —"धांव घाली साईनाथा चालू नको मंद। वनवासी देह माझा किती पाहसी अन्त" आणि दुसरी प्रार्थना "बाळा मी झालो व्याकुळ कंठासी आला रे प्राण" या दोन प्रार्थना आणि आरती करून श्रीसद्गुरुचरणीची उदी तिचे अंगाला चोळली. आम्ही जेव्हां आरतीला सुरवात केली तेव्हां ती रडण्याची थांबली व थोड्या वेळांत झोपी गेली. आजपावेतों या मुलीला कशाचीच भीति वाटत नाहीं. अशा प्रकारें श्रीसाई-बाबानी आम्हांला संकटमुक्त केलें.

श्रीसाईचे वचन :—

"माझ्या समाधिची पायरी चढेल,
दुःख हें हरेल सर्व त्यांचे"—

× × ×

## अनुभव ५ वा

**श्रीसद्गुरु साईबाबांचें मूषक रूपांत भक्तांना दर्शन**

पुलगावमध्यें असतांना मी सन १९५९ मधील श्रावण महिन्यापासून नवनाथ ग्रंथ, श्रीगुरुचरित्र आणि श्रीसद्गुरु साईचरित्र यांचें पारायण चालविलें होते. एस.

पी. कॅम्प पुलगांवमधील आजुबाजूंचे भक्तगण जमत असत. आश्विन महिन्यांत नवरात्रीचे सातवे दिवशीं श्रीसाईसच्चरित्राची समाप्ती केली. श्रीसत्यनारायणाची पूजा चालू होती. मी तुळशी वाहत होतो आणि नंतर सद्गुरुसाई चरित्राचा शेवटचा अध्याय वाचावयास सुरुवात केली, तोच एक लहान उंदीर चौरंगावर पूजा स्थानीं येऊन बसला. सर्व जमलेल्या मंडळींना वाटलें कीं, हा उंदीर इकडे तिकडे फिरून पूजा मोडेल, दिवा पाडेल, परंतु चमत्कारच घडला. हा उंदीर केळीच्या खुंगाच्या एका पानावर बसला आणि शेवटीं आरती, प्रसाद व नैवेद्य झाल्यावर निघून गेला. सर्व भक्तांना याचें फार कौतुक वाटलें. आणि सर्वांनीं त्या उंदीररूपी सद्गुरुचें दर्शन घेतलें.

" ज्या ज्या ठिकाणीं मन जाय माझे। त्या त्या ठिकाणी नीज रूप तुझें ॥
मीं मस्तक ठेवितों ज्या ठिकाणीं। तेथेंच सद्गुरु तुझे पाय दोन्ही ॥ "




## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह (स्टँप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
श्री साईलीला मासिक

# श्री अरविंद-वाणी

## विश्रांति आणि योगशक्ति

ज्यावेळीं उच्चतर शक्तीचा पूर्ण प्रभाव असेल, मनांत चलबिचल नसेल आणि भाव शुद्ध असेल, शिवाय ईशशक्तीच्या प्रभावाबद्दल संपूर्ण व एकनिष्ठ श्रद्धा असेल तर शरीरही कार्यांत न थकतां तग धरूं शकेल; पण जर मन आणि भावना यांनीं ईशशक्तीला आवाहन न करतां अन्य विचार, भावना अथवा शक्ति यांचा प्रभाव स्वीकारला असेल तर अशी चमत्कारिक, संमिश्र स्थिति निर्माण होईल कीं तेथें कधीं कधीं सामर्थ्य तर कधीं थकवा, कधीं हातपाय गळाठण किंवा कधीं आजार अथवा दोन्हीही दोष एकदम आपल्या ठिकाणीं उद्भूत झालेले दिसतील.

शेवटीं जर केवळ मन व भावच नव्हे तर शरीरही उच्चतर दिव्यशक्तीच्या आगमनास खुलें राहील व ती शक्ति धारण करून भिनवूनही टाकू शकेल तर शरीरस्वास्थ्य यत्किंचितही न बिघडतां आपल्या देहाकडून अतर्क्य व आश्चर्यकारक कामें सहजासहजीं होत राहतील. तरी पण विश्रांतीची जरूरी राहीलच. म्हणूनच रजोगुणप्रधान साधकांना आग्रहपूर्वक श्रम व विश्रांति यांत समतोलपणा राखण्याबद्दल सुचविलें आहे.

संपूर्णपणें थकव्यापासून शरीरमुक्त असण्याचीही शक्यता आहे. पण जेव्हां शरीरावर चाललेले प्रकृतीचे कायदे, त्यांचें परिवर्तन घडल्यामुळें, लागूच शकेनासे होतात तेव्हांच. कारण त्या स्थितींत अतिमानसशक्तीचें अवतरण पूर्णांशानें या भूतप्रकृतीच्या ठिकाणीं झालेलें असतें.

## प्रत्येक मनुष्याला परमेश्वरी आदेश आहे

परमेश्वर मनुष्याला विशिष्ट आदेश देतो असें म्हणणें व आपण ईश्वरीकार्य पार पाडणारे त्याचे हातांतील एक साधन आहों असें मानणें हा एक प्रकारचा उद्दामपणा आहे असें कांहींजण मानतात. पण माझा अनुभव असा आहे कीं, प्रत्येक मनुष्याला परमेश्वराचा कांहींतरी एक आदेश असतोच. परमेश्वर तर कधीं कधीं काबाडकष्ट करणाऱ्या मजुराच्या कुदळीचा साधन म्हणून उपयोग करतो, तर कधीं एखाद्या अर्भकाच्या बोबड्या वाणीनेंही जगाशी बोलत असतो.

---

# कांहीं विचार करण्यासारखें

—संत विनोबा

भ्याड आणि क्रूर एकच.

उपयुक्ततावाद आपली स्वतःची उपयुक्तता गृहीतच धरतो !

नदीमध्यें मी देवाची वाहती करुणा पाहतों.

सात्त्विक–निर्गुण, आकाशांत डोकें. सात्त्विक–सगुण भूमीवर पाय.

पारमार्थिक साधनेचा आरंभ आत्मविषादापासून 'विषादयोगो' नाम प्रथमोऽध्यायः ।

चित्त धुण्यास उपयोगी–मृत्तिका–तपस्या जल–हरिप्रेम

'तत्' आणि 'त्वम्' ह्यांचा सांधा 'असि' म्हणजेच उपासना, म्हणजेच ज्ञान.

कोणत्या हि संपूर्ण दर्शनांत खालील तीन विचार आवश्यक आहेत—

(१) कार्याकार्य–विचार (२) कार्यकारण–विचार (३) कार्यकर्तृत्व–विचार.

ज्ञानी पुरुषाच्या आभासिक कर्मांचे हेतु

(१) लोकसंग्रह (२) प्रारब्ध–क्षय (३) साधना–दार्ढ्य (४) सहजानंद

"हातचा" निखारा गेला म्हणून कोण तक्रार करील ? संसार "हातचा" निखारा आहे. तो सोडून पळत्या परमार्थाचा खुशाल पाठलाग करावा.

कोणी "माया" म्हणतात, कोणी 'लीला' म्हणतात, कोणी स्फूर्ति म्हणतात, काहीच न म्हटलें तर काय वाईट ?

प्रतिपक्ष–भावनेपेक्षां अभावना अधिक परिणामकारक आहे.

आत्मचिंतन म्हणजे आत्मशवर्ताचें चिंतन. वस्तुतः आत्मा अचिंत्य आहे.

विनाश हें विकासाचें अपरिहार्य अंग आहे. पण तो प्रयोग ज्याचा त्यानें स्वतःवर च करावयाचा.

"अहिंसादि प्रकृतीचे गुण कीं आत्म्याचे ?' अहिंसादि प्रकृतीचे गुण नाहीत आणि आत्म्याचे हि 'गुण' नाहीत. ते आत्म्याचे 'स्वभाव-धर्म' आहेत.

अवतार विश्वमान्य होतो. साधूला कुत्र्यानें साथ दिली तर भाग्य म्हणावयाचे.

कर्म-योग म्हणजे रजोगुण नव्हे. तो रजोगुणावर तोडगा आहे.

भौतिक ज्ञान अज्ञान नसले तर ऐश्वर्य असेल. पण तें ज्ञान नव्हे च.

एका पक्ष-जग साधूसाठीं नाहीं, म्हणून साधूंनी अलग रहावें.

दुसरा पक्ष-जग साधूंसाठीं च आहे, म्हणून साधूंनी धीर धरावा.

भावार्थ, जग साधूसाठीं असो अथवा नसो, साधूंनीं साधुत्व केंव्हांहि सोडूं नये.

निर्दोष यज्ञाची अशक्यता नसती तर भक्तीची आवश्यकता नसती.

तूं म्हणतोस-प्रयोगावरून ठरलें म्हणून पक्कें.

मी म्हणतों-प्रयोगावरून ठरलें म्हणूनच कच्चें.

"मला काय उपयोग ?" असें न म्हणता "माझा काय उपयोग" असें म्हणावें म्हणजे उपयुक्ततावादाचें सार्थक होईल.

जगाचा कर्ता कोण ?-

"माझ्या जगाचा मीच कर्ता आहे." दुसऱ्या जगाची मला ओळखच नाहीं.

प्रत्यक्षानें अंध झालेल्या बुद्धीला सनातन सत्यें कशीं दिसणार ?

विश्वांत आत्मा पहावा आणि आत्म्यात विश्व पहावें. ह्याचें नांव स्व-परावलंबन.

१ आत्मपरीक्षण, २ मीन मला म्हणाला, "आतां ह्यापुढें मी पळत नाहीं, तुझें तूं पाहून घे." मीहि कापत कापत पण, निश्चयानें त्याच्याजवळ बसलों. इतक्यांत वाघ नाहींसा झाला आणि स्वप्नहि गेले.

निर्गुण-सगुण, उपास्य-उपासक, मी-तूं, सज्जन-दुर्जन, जड-चेतन हे पांच भेद मावळले म्हणजे संपूर्ण अद्वैत.

इच्छा, प्रयत्न, कृपा, प्राप्ति.

कर्म > अकर्म पण, ज्ञान + कर्म = ज्ञान + अकर्म कारण, ज्ञान = ∞ ( अनन्त ).

वेदान्तासारखा अनुभव नाहीं. गणितासारखें शास्त्र नाहीं. रसोईसारखी कला नाहीं.

गुरु अव्यक्त—मूर्ति आहे. वाटल्यास शब्द-मूर्ति म्हणा.

देहासक्ति, ज्ञानासक्ति, दयासक्ति.

चित्तशुद्धिकारक ह्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि नात्यानें कर्माकडे पाहणें मला रुचत नाहीं.

वारा आपणहून माझ्या खोलीत येतो. सूर्य आपणहून माझ्या खोलीत शिरतो. देवहि तसाच आपणहून भेटणार आहे. माझी खोली मोकळी असूं दे म्हणजे झालें.

देवाचें सौंदर्य, सामर्थ्य, ज्ञान, पावित्र्य, प्रेम निरंतर आठवावें.

' महत्वाकांक्षा '—किती अल्प वस्तु ही !

१ बुद्धीची स्थिरता, २ निष्काम सेवा, ३ इंद्रिय-निग्रह, ४ भक्तीचा जिव्हाळा, ५ आत्मज्ञान, दैवी संपत्तीचा विकास आणि संन्यास ह्या सात अंगांनीं धर्म पूर्ण होतो.

मोकळ्या हवेंत सच्चिदानंदाची भेट होते.

आकाश—सत्, वायु—चित्, तेज—आनंद.

बुद्धि अमलांत आणणें म्हणजेच बुद्धि ' चालवणें.'

भक्ति माय आणि योग बाप असा बेत जमला तर आम्हां मुलांच्या ठिकाणीं ज्ञान सहजच उगवेल. स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाची दिशाहि ह्यावरून लक्षांत येते.

ब्रह्मचारी म्हणजे स्त्री आणि पुरुष एकस्थ.

बुद्धि श्रद्धेसारखी दुबळी नाहीं. बुद्धि श्रद्धेसारखी बलवान नाहीं.

अति दूर पाहणें आणि मुळींच न पाहणें हें ठेंच लागण्याचे दोन उत्तम उपाय आहेत.

ज्ञानापेक्षां दृष्टि थोर.

अभय दोन प्रकारांनीं आहे: आपण कोणास न भिणें, आणि आपलें कोणास भय न वाटणें. हें दुहेरी अभय मी आकाशाच्या ठिकाणीं पाहतों. आकाशासारखें मला शून्य झालें पाहिजे असा ह्याचा अर्थ होतो.

कोणता तारा उंच आणि कोणता खालीं ह्याला जो अर्थ आहे ( म्हणजे मुळींच नाहीं ) तोच कोणता माणूस उंच आणि कोणता नीच ह्याला अर्थ आहे. दोन्ही एकाच आकाशांत भिन्न भिन्न जागीं आहेत एवढेंच म्हणावयाचें.

वस्तूचें स्वरूप क्षणोक्षणीं बदलतांना दिसतें ह्याचा अर्थ वस्तु मिथ्या आहे असा नसून वैभवशाली आहे असा समजावा.

वासना नाहींशी झाली म्हणजे सृष्टि दोन्ही अर्थांनीं 'अ–मूल्य' बनते.

१ श्रुति (तत्त्व–सिद्धान्त) २ स्मृति (सामाजिक धारा) ३ पुराण (पूर्व संतांचीं चरित्रें) ४ भक्ति (उपासना) ५ नीति (अहिंसा–सत्यादि सिद्ध पंथ)

हें सर्व धर्मांचें पंचांग आहे.

व्युत्पत्ति–व्याकरणाचा विषय आहे.

निरुक्ति–हें आध्यात्मिक शास्त्र आहे.

सेवा–व्यक्तीची, भक्ति–समाजाची.

मनुष्य–घर, गुण–दरवाजा, दोष–भिंती.

## कर्माच्या तीन पायऱ्या

मानवीय स्तरांतुन ईश्वरीय स्तरांत प्रवेश करायास गीतेनें कर्माच्या तीन पायऱ्या दाखविल्या आहेत. सर्व वासनांचा त्याग करून सर्व कामें परमेश्वराच्या उद्देशानें यज्ञस्वरूप समजून समतेनें करणें ही पहिली पायरी. कर्मफलाप्रमाणेंच कर्माच्याही ठिकाणीं आपला अधिकार नाहीं ह्याची उपलब्धि असणें ही दुसरी पायरी आणि तिसरी पायरी म्हणजे प्रकृति आणि पुरुषाच्या पलीकडे असलेल्या पुरुषोत्तमाची ओळख पटणें ही होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे परमप्राप्तीची कर्मयोग ही पहिली, ज्ञानयोग ही दुसरी व भक्तियोग ही तिसरी व शेवटची पायरी होय.

# पोंच व अभिप्राय

## तुळजापूरची भवानीमाता

( लेखक : श्री. सदानंद चेंदवणकर, प्रकाशक : निर्णयसागर प्रेस, २६-२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २, किंमत २ रु.) श्रीक्षेत्र तुळजापूर हें महाराष्ट्रांतील प्रख्यात क्षेत्रांपैकीं एक आहे. तुळजापूरची आई भवानी हें एक जागतें दैवत आहे. फार प्राचीन काळापासून या दैवताची ख्याति आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचें हें कुलदैवत. त्यांच्या वडिलांची व त्यांची भवानीमातेवर फार दांडगी श्रद्धा होती. त्या काळापासून तर हें दैवत सर्वांच्या अत्यादराचें स्थान होऊन राहिलें आहे. शिवाजी महाराज कोणत्याही महत्त्वाच्या प्रसंगीं कौल घेण्यासाठीं मातेकडे येत असत. तिच्या वरील त्यांची श्रद्धा अवर्णनीय होती.

श्री. चेंदवणकर यांनी या दैवतासंबंधानें अगदीं प्राचीन काळपासूनची माहिती देऊन ती सुबोध रीतीनें आजतागायत आणून ठेविली आहे.

श्रीदेवीचा महिमा मंदिराची अद्ययावत् माहिती, श्रीदेवीचे उत्सव, पूजाअर्चा, तुळजापूरमधील मठ, तीर्थें, श्रीदेवीचे अलंकार, देवीचीं स्तोत्रें व सर्व प्रकारची माहिती या पुस्तकांत समाविष्ट केली आहे. ज्या भक्तांस तुळजापूरला भवानी दर्शनासाठी जायचें असेल त्यांचें उत्तमप्रकारें मार्गदर्शन या पुस्तकानें होणार आहे. अंतरंगाप्रमाणें पुस्तकाचें बाह्यांगही निर्णयसागरच्या लौकिकास साजेसें आहे.

## पंढरपूरचा विठोबा

( लेखक व प्रकाशक वरीलप्रमाणें. किं. २ रु. ) श्रीक्षेत्र पंढरपूर म्हणजे संतांचे माहेरघर. भक्तिभावाचें आगर. अखिल महाराष्ट्राचे वंदनीय नि पुण्यपावन क्षेत्र. पंढरपूर म्हणतांच कितीतरी पवित्र भावना अंतःकरणांत उचंबळून येतात. भक्त पुंडलिकापासून तों तहत् भगवद्भक्त दासगणूमहाराजांपर्यंत सर्व नामवंत व जनतेच्या आदरास पात्र होऊन राहिलेल्या साधुसंतांचे पाय या क्षेत्रास लागले आहेत व पुण्य-पावन चंद्रभागेंत स्नान करून येथील विठोबाच्या दर्शनानें आजवर असंख्य भक्त पुण्यपावन झाले आहेत. जन्माला येऊन पंढरपूरला जावें नि विठोबाचें दर्शन घ्यावें

ही प्रत्येक महाराष्ट्रीय स्त्री-पुरुष भक्ताची आकांक्षा असते. पंढरपूरनें प्रत्येकावर भक्तिभावाची मोहिनी घातली आहे.

भक्त पुंडलीक आणि पंढरपूर यांचा अन्योन्य संबंध अत्यंत निकट आहे. तो निकट कसा आहे हे लेखकानें इतिहासाच्या आधारें अत्यंत सोप्या भाषेत सांगितलें आहे. त्याचबरोबर पंढरपूरक्षेत्राचा प्राचीन इतिहास धुंडाळून तोही भाविक वाचकांपुढें ठेविला आहे.

पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठीं जाण्यापूर्वी चंद्रभागातीर्थ, तेथील विठ्ठलमंदिर, विठोबाचें तें सुंदर ध्यान, तेथील नित्योपचार, तेथील महोत्सव, एवढेंच नव्हे तर पंढरपूरला कसें जावें, पंढरपूरच्या आसपास पहाण्यासारखें काय आहे, पंढरपूरला पालख्या कोणत्या जातात, कोठें उतरतात, संतांनीं पंढरपूरचें महात्म्य कोणत्या शब्दांत व भक्तिभावानें कसें वर्णिलें आहे याचाही परिचय लेखक श्री. चेंदवणकर यांनीं उत्तमप्रकारें करून दिला आहे.

## सुरम्य क्षेत्र श्रीकनकेश्वर

( लेखक व प्रकाशक वरीलप्रमाणें. किं. २ रु. ) श्रीकनकेश्वर हें कोंकणपट्टीतील एक सुरम्य क्षेत्र आहे. हें मुंबईपासून सुमारें २५ मैल व अलिबागेपासून आठ मैलांवर आहे.


या छोटेखानी पुस्तिकेंत कनकेश्वरसंबंधीं सर्व कांहीं देण्यांत आलें आहे. त्या क्षेत्राचा प्राचीन इतिहास, आजकाल श्रीसंत श्रीधरस्वामी व इतर संतांच्या वास्तव्यामुळें त्याला आलेलें महत्त्व तसेंच श्रीकनकेश्वर मंदिर, तेथील उत्सव, जाण्याचे मार्ग, तेथील सृष्टिसौंदर्य, तेथील परिसरांत काय काय पहाण्यासारखें आहे, यासंबंधी सचित्र नि सुबोध माहिती करून देण्यांत आलेली आहे. हीं सर्व पुस्तकें निर्णयसागरच्या मनोहर छपाईमुळें प्रत्येकाला हातांत धरावीं अशी वाटतील.

**अवधूत भक्तांची श्रद्धास्थानें**—( लेखक नि प्रकाशक वरीलप्रमाणें. किंमत ३ रु. ) श्रीदत्तमहाराज हें विशेषतः प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबाचे आराध्यदैवत व अपरंपार श्रद्धेचें स्थान आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. महाराष्ट्रांत दत्तभक्तीला फार महत्त्वाचें स्थान आहे. भक्तिभावानें त्यांची तसबीर लावून तिला दर गुरुवारीं पुष्पहार अर्पण करणारी कुटुंबें महाराष्ट्रांत सर्वत्र आढळून येतील.

महाराष्ट्रांत गाणापूर, कारंजा, अक्कलकोट, नरसोबाची वाडी. औदुंबर वगैरे दत्तवास्तव्यानें पुनीत झालेलीं अनेक तीर्थस्थानें आहेत. त्या तीर्थक्षेत्रीं जाऊन त्या देवतेच्या पादुकांचें किंवा मूर्तीचें दर्शन घेणें यांत प्रत्येकाला जीवन साफल्य वाटत असतें.

अशी दत्तस्थानें महाराष्ट्रांत माहूर, पोठापूर, लाडकारंजा, औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर, अक्कलकोट, माणिकनगर, नाशीक, चौल, चोखेड, वगैरे ठिकाणी आहेत. त्या प्रत्येक स्थानाची सर्व प्रकारची–प्राचीन नि अर्वाचीन माहिती प्रयत्नेंकरून मिळवून व त्या त्या पवित्र स्थानास भेट देऊन लेखक श्री. चेंदवणकर यांनी ती माहिती या पुस्तकांत सचित्र व सुबोध रीतीनें देऊन अखिल दत्तभक्तांस ऋणी करून ठेविले आहे.

निर्णयसागरी छपाईमुळें या पुस्तकाच्या सौंदर्यांत अनुपम भर पडली आहे. प्रत्येक दत्तभक्तानें संग्रहीं ठेवावें असें हें पुस्तक आहे.



# भक्तांकडून आलेल्या देणग्यांची साभार पोंच

खालील देणग्या ठिकठिकाणच्या श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानकडे हॉस्पिटल फंड, बिल्डिंग फंड किंवा शिक्षण फंड या प्रीत्यर्थ आलेल्या आहेत. देणग्या पाठविणाऱ्यांचे शिर्डी संस्थान आभारी आहे.

| भक्तांचे नांव | गांव | रु. | पैसे |
|---|---|---|---|
| श्री. कै. यादवराव भा. पुरंदरे | मुंबई ९२ | २५ | ०० |
| श्री. एस्. एन्. वाघ | मुंबई | १० | २५ |
| मिसेस व्ही. शकुंतलाबाई | मुंबई ७१ | १२५ | ०० |
| श्री. रामचंद्र गो. राव | बरोडा | १०० | ०० |
| ,, के. शंकर नारायण राव | न्यू दिल्ली | ९० | ०० |
| ,, बी. एन्. पटेल | मुंबई ४ | २१ | ०० |
| ,, पारीमल देसाई | मुंबई १ | २१ | ०० |
| कै. सौ. लीलावती जी. जाधव (हस्ते) (आशादेवी कोपरे) | पुणे | ५१ | ०० |
| श्री. आर. के. के. नारायण | ग्वालीयर | २५ | ०० |
| ,, व्ही. के. झाम | मुंबई ५४ | २५१ | ०० |
| ,, दत्ता | मुंबई | ५ | ०० |
| ,, एम्. एन्. साहूकर | मुंबई ५० | ७ | ०० |
| ,, बी. एस्. डिंग्रा | मुंबई | ११ | ०० |
| ,, राज गुप्ता | मुंबई | ११ | ०० |
| ,, सी. बी. पटेल | मुंबई १४ | ५० | ०० |
| ,, एस्. जे. मुलाकीया | मुंबई ६ | १०१ | ०० |
| ,, पी. पी. देवरा | सिकंदराबाद ३ | ११ | ०० |
| ,, भानजी दाजी बागवे | मुंबई २८ | ११ | ०० |
| ,, व्ही. के. शहा | मुंबई | १५१ | ०० |
| ,, आर. के. शहा | मुंबई ३१ | १५१ | ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| „ अरविंद मुकुंद सोमण | पनवेल | ५१ | २५ |
| „ बी. जी. के. राव | मुंबई | १५० | ०० |
| डॉ. के. ए. देव | सौराष्ट्र | ५१ | ०० |
| श्री. ठाकोरदास दिपचंद | मुंबई | ५१ | ०० |
| श्री. दादासाहेब व भा. ऊ. भापकर | | | |
| „ एस्. एम्. भापकर | पुणें २ | ५०१ | ०० |
| „ कीर्तिकुमार आर. पटेल | मुंबई ७ | ५१ | ०० |
| „ ए. एम्. मेहतानी | मुंबई ७१ | २०१ | ०० |
| „ राकेश जी. मेहतानी | „ | १५ | ०० |
| श्रीमती प्रभाबाई जोशी | नासिक | ५ | ०० |
| श्री. व्ही. पी. नातू | कोल्हापूर | ५ | ०० |
| „ पी. यू. कुरेकार | वशेरा | १०१ | ०० |
| „ रतनलाल रखास भाटीया | लुधीयाना | १२५ | ०० |
| „ एस. एम्. हाल | नांदेड | १०१ | ०० |

## शिक्षणफंड

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. आर. जी. नाईक | नवसारी | ५ | ०० |
| „ पी. एम्. शहा | मुंबई | ५९ | ५० |
| „ बी. के. श्रॉफ | मुंबई | १०१ | ०० |
| डॉ. रंजन भट | मुंबई | ११ | ०० |
| श्री. एस. जी. जांभेकर | अमदाबाद | ११ | ०० |
| श्री. सी. एल. जैन | पाचोरा | ११ | ०० |
| श्री. एस. ए. कुमार | मुंबई ५२ | ५१ | ०० |
| „ कीर्तिकुमार र. पटेल | मुंबई | ५१ | ०० |

## बिल्डिंग फंड

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. घोतीवाला | नासिक | ११ | ०० |
| „ एल. के. जैन | पाचोरा | ११ | ०० |
| „ डायाभाई सी. पटेल | गुजराथ | ५१ | ०० |
| श्रीमती मधुबेन जे. पटेल | „ | ११ | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री, हेसराज ट्रेडींग कंपनी | दिल्ली ९ | १५१ | ०० |
| ,, रतनलाल रखास भाटीया | लुधीयाना | १२५ | ०० |

## फंड व बिल्डिंग फंड

(देणगी देणाऱ्या साईभक्तांची यादी दि. १–६–६७ ते ३०–९–६७ पर्यंत)

| | | | |
|---|---|---|---|
| मिसेस कारोली नातू | न्यू दिल्ली | १० | ०० |
| मेजर एम. व्ही. नातू | C/o 56 A.P.O. | १० | ०० |
| मिसेस करोली नातू | न्यू दिल्ली | १२ | २५ |
| मेजर एम्. व्ही. नातू | न्यू दिल्ली | १० | ०० |
| श्री. डी. ए. नायडू | नरसिंगपूर | १०० | ०० |
| ,, रामचंद्र C/o एम्. बी. गावडे | इन्दोर | ६ | ०० |
| ,, हेमंत हळवे | पुणें ९ | ५ | ०० |
| मेजर एम्. व्ही. नातू | कोल्हापूर | १० | ०० |
| श्री. एल. एन्. भालसाखले | मुंबई ७ | ५ | ०० |
| ,, आर के. कुळकर्णी | ठाणा | २० | ०० |
| मेजर एम्. व्ही. नातू | कोल्हापूर | १० | ०० |
| श्री. एच. एस. हाळवे | पुणें ९ | ५ | ०० |
| ,, रामचंद्र C/o एम्. बी. गाडवे | इन्दोर | ६ | ०० |
| ,, पी. डी. कालेकर | मुंबई २९ | ५ | ०० |
| मिसेस सुधा के. डींके | इन्दोर | ५ | ०० |
| श्री. बलवंत आर. वर्मा | रांची | ५ | ०० |
| मेजर एम्. व्ही. नातू | कोल्हापूर | १० | ०० |
| श्री. एच. एस. हाळवे | पुणें ९ | ५ | ०० |
| ,, ईश्वरलाल पुरुषोत्तमदास | मुंबई १ | १०० | ०० |
| ,, रामचंद्र C/o एम्. बी. गावडे | इन्दोर | ६ | ०० |
| ,, एम्. बी. कामत | मुंबई १६ | ५० | ०० |
| सौ. ताराबाई ढुमणे | औरंगाबाद | ५० | ०० |

## बिल्डिंग फंड

| | | | |
|---|---|---|---|
| मेजर चरणजीत सिंग | पठाणकोट | ५०० | ०० |
| श्री. आर. व्ही. कुलेकर | मुंबई | ३० | ०० |
| श्री. व्ही. कृष्णमूर्ती | मद्रास ३ | ५० | ०० |

## मुंबई कचेरीकडे जमा, चेकने आलेला हॉस्पिटल फंड
## ११–६–६७ ते ३०–९–६७

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीकृष्ण सूर्यप्रकाश | यादगिरी | ११०० | ०० |
| डॉ. होमि बाटलीवाला | मुंबई | ७७७ | ०० |
| श्री. रसीक शहा | ,, | २१० | ०० |
| ,, माळी पाटील | कावालूर | २०९ | ०० |
| ,, जी. आर. रामचंद्र | बडोदे | २०० | ०० |
| ,, आर. एम्. वकील | मुंबई | २०० | ०० |
| ,, डी. टी. मोदी | ,, | १५० | ०० |
| ,, हिरालाल शहा | ,, | १३५ | ०० |
| ,, एम्. आर. काळे | ,, | १२१ | ०० |
| मे. सीटो रेडीओ कं. | ल्यसाका | १०४ | ०० |
| श्री. एन्. एम् कामते | मुंबई | १०१ | ०० |
| कु. संजय पी. वधवा | ,, | १०१ | ०० |
| जस्टीस जे. आर. मुधोळकर | दिल्ली | १०१ | ०० |
| डॉ. मिसेस निमाज पंडीत | मुंबई | १०० | ०० |
| श्री. व्ही. एस. पंडीत | ,, | १०० | ०० |
| मिसेस रश्मी एम् भट | आफ्रिका | ६० | ०० |
| श्री. एफ. एन्. बालापोरिया अॅ. सन्स | मुंबई | ५१ | ०० |
| श्रीमती रजनी फुले | नासिक | ५१ | ०० |
| मे. के. के. कुमार अॅ. कं. | देवळाली | ४० | ०० |
| श्री. पी. बी. देसाई | अहमदाबाद | ३५ | ०० |
| डॉ. चंपा आफळे | न. दिल्ली | ३३ | ०० |
| श्री. एन्. एफ. पटेल | आफ्रिका | २० | ८० |
| ,, एस. के वागळे | मुंबई | १५ | ०० |
| ,, आर. एच. टिपणीस | मुंबई | ११ | ०० |
| कु. शरयु तळपदे | मुंबई | ११ | ०० |
| श्री. आर. एम्. शहा | बडोदे | ११ | ०० |
| ,, के. महतानी | मुंबई | १० | ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, पी. सी. काळे | मुंबई | १० | ०० |
| ,, के. बी. पटेल | इंग्लंड | ६२ | ४० |
| ,, टी. हरिंद्रनाथ | एर्नाकुलम | ३० | ०० |

## रोख आलेले

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. व्ही. एस. सेठ | मुंबई | १०० | ०० |
| मे. गोल्ड सोप कं. | मुंबई | ३७ | ०० |
| श्री. एस. जी. भट | मुंबई | ३५ | ०० |
| श्रीसाईभक्त २०+५ | मुंबई | २५ | ०० |
| श्री. ज. शं. चौबळ | अंधेरी | २० | ०० |
| ,, भा. मा. चौबळ | अंधेरी | ११ | ०० |
| ,, ए. टी. कुबेर | खार | १५ | ०० |
| ,, एम्. एन्. वाळकर | मुंबई | ११ | ०० |
| श्रीमती सुहासिनी सावंत | ,, | ११ | ०० |
| सौ. सुशीला जी. कुळकर्णी | ,, | १० | ०० |
| श्री. व्ही. एम्. गडकरी | ,, | १० | ०० |
| श्रीमती इंदुमती व. साघले | ,, | १० | ०० |
| ,, सुलभा का. पोतनीस | ,, | ७ | ५० |
| श्री. किसन जखोतीया | ,, | ६ | ०० |
| ,, गोपाळ आयर | ,, | ५ | ०० |
| ,, दिलीप केरकर | ,, | ५ | ०० |
| मे. झवेरी कं. | ,, | ५ | ०० |

## शिक्षण फंड चेकने

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शोभि बाटलीवाला | मुंबई | १०८ | ०० |




# सप्टेंबर १९६७

या महिन्यांत बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी ( आवक जावक ) बरीच होती. नाशिक येथील सिंहस्थपर्वणीची गर्दी शिर्डीसही बरीच होती. काहीं कलाकारांनी हजेरी दिली ती खालीलप्रमाणे.

## कीर्तन

श्री. ह. भ. प. रामचंद्र गोविंद पाटील मु. पेठ. (विदर्भ) श्रीमती यमुनाबाई कवनूरकर ( समर्थ सेवा मठ सज्जनगड ) सातारा श्री. ह. भ. प. पांडुरंग गंगाधर वैद्य वंकट स्वामी मठ पंढरपूर. संस्थानगवई मराठे यांची कीर्तनं नेहमीप्रमाणें झाली.

## गायन

श्री. अंजनीबाई लोलेकर ( रामचंद्र वंकर ) मुंबई.

कुमार साईराम रा. वॅंकर ( तबलावादन )

कुमारी सुवर्णा रामचंद्र वॅंकर ( गायन ) मुंबई

## नृत्य

अरुण डॅान्सिंग पार्टी पुणें ५८४ गुरुवार प्रो. ग्यानदेव रंभाजी काळे.

## भजनमंडळी

श्री. डी. एस. बापू मद्रास भजन मंडळी

श्रीसाईबाबा भक्त भजन मंडळी बेंगळूर ( म्हैसूरप्रांत )

श्री. मधुकर नामदेव शेळके नारायणगांव भजनी मंडळ

**तबला सोलोवादन**

तबला केसरी मुरली महाराज, मुंबई

श्री. रामदास काशिनाथ लोलेकर, मुंबई

गणपती उत्सव दरवर्षीप्रमाणें उत्साहात पार पडला.

**कांहीं नामवंत मंडळींचें आगमन**

मे. नामदार यशवंतराव चव्हाण गृहमंत्री केंद्रीय सरकार

सौ. वेणुताई चव्हाण

श्री. हरिभाऊ पाटसकर कुलगुरु, पुणें विद्यापीठ


मे. डी. डी. रणदिवे जिल्हाधिकारी, अहमदनगर

**सहकारी ग्राहक भांडार**

संस्थान नोकरांनी ता. २०–९–१९६७ सहकारी ग्राहक भांडार स्थापन केल्यापासून सर्व संस्थान नोकर त्यांचा फायदा घेत आहेत. या कार्याची सुरुवात फार चांगली झाली असून कार्यकर्ते भांडार यशस्वी व्हावें यासाठीं मनापासून झटत आहेत.

**शिर्डी येथील हवापाणी —**

उत्तर नक्षत्राना पाऊस शिर्डीस खूप झाला. रोगराई कांहीं नाहीं. हवा चांगली आहे.



— श्री साई सच्चरिताचें गुजराथींत भाषांतर करणारे परम साईभक्त श्री. आर. जी. सोमपुरा हे ता. १३ सप्टेंबर १९६७ रोजीं अहमदाबाद येथें श्री साईचरणीं विलीन झाल्याचें लिहिण्यास दुःख वाटतें.